रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २७० । पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28 www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १० मार्च २०२६

किंमत ४ ₹


## शेतजमिनीत विषारी रसायनांचा डंप

**पनवेल:** तळोजा परिसरातील धानसर गावाजवळील शेतजमिनीत घातक औद्योगिक रसायनांची बेकायदेशीर विल्हेवाट लावण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. तब्बल २०० पिंपांमध्ये भरलेली विषारी रसायने आणि ४० गोण्यांमध्ये साठवलेला घातक औद्योगिक कचरा आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पर्यावरणावर मोठा धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या •➤ पान ५ वर

## हजारो कंटेनर जेएनपीए बंदरातच

**चिरनेर :** इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यातील युद्धाच्या झळा भारतालाही बसू लागल्या आहेत. भारतीय माल आखातात घेऊन जाणारे हजारो कंटेनर युद्धाच्या या भडक्यामुळे आठवडाभरापासून जेएनपीए बंदरात अडकून पडले आहेत. या कंटेनरमधील माल हा पुन्हा स्थानिक बाजारपेठेत आणण्यासाठी लाखो रुपये खर्च येणार आहे, तर अनेक दिवसांपासून अडकून पडल्याने तो खराब होऊन शेतकरी व निर्यातदारांना मोठा आर्थिक फटका बसण्याची भीती व्यक्त होत आहे. मुंबईनजीकच्या जेएनपीए बंदरातून दररोज हजारो कंटेनरची हाताळणी •➤ पान ५ वर

### जिल्ह्याचा विकास अडचणीत; आमदार निधीतील ४ कोटी शिल्लक


# आमदारांचा निधी तिजोरीत

■ निधी खर्च करण्यास दळवी, थोरवे पिछाडीवर

■ एक कोटीहून अधिक निधी अखर्चित असल्याची माहिती समोर

### निधी खर्च केल्यावर दृष्टीक्षेप

| आमदार | प्राप्त निधी | प्र.मा.कामे | खर्च केलेला निधी | प्र. मा. रक्कम |
|---|---|---|---|---|
| महेंद्र थोरवे | ३०९.२६ | ४६ | २३१.४८ | ४८९.४५ |
| महेंद्र दळवी | ३३२.८१ | ४२ | २२७.२५ | ५३५.७४ |
| प्रशांत ठाकूर | ३०८.८६ | ४७ | २५४.७० | ५१४.६५ |
| महेश बालदी | ३१४.६२ | ४० | २८८.३३ | ४३४.०१ |
| रवि पाटील | ३०३.९९ | ३३ | २८२.५७ | ६१२.०७ |
| आदिती तटकरे | ३३३.९४ | ४२ | २८४.६८ | ४३२.६६ |
| भरत गोगावले | ३०९.४८ | ४० | २९८.०१ | ६०४.२४ |
| एकूण | २२१२.९६ | २९० | १८६७.०२ | ३६२२.८२ |




। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

एकीकडे निधीअभावी विकासकामे रखडल्याची आरोळी ठोकली जात असताना दुसरीकडे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम ांतर्गत मिळालेला कोट्यवधी रुपयांचा निधी मात्र अखर्चित पडून असल्याचे वास्तव समोर आले आहे. अलिबाग आणि कर्जत मतदारसंघात लाखो-कोट्यवधींच्या कामांचा गाजावाजा केला जात असतानाच प्रत्यक्षात निधी खर्चाच्या बाबतीत मोठी पिछाडी दिसून येत आहे. त्यामुळे ङ्गङ्घनिधी नाही म्हणून कामे होत नाहीतफ्फ हा दावा कितपत खरा, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विधानसभा मतदार संघातील कार्यक्षेत्रातील स्थानिक विकासासाठी आमदारांना निधी प्राप्त झाला. यामध्ये अलिबाग विधानसभा मतदार संघातील आमदार महेंद्र दळवी व कर्जत मतदार संघातील आमदार महेंद्र थोरवे हा निधी खर्च करण्यास पिछाडीवर असल्याचे समोर आले आहे. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी एक ते दीड कोटीहून अधिक निधी अखर्चित असल्याचे दिसून आले आहे. करोडो रुपयांचा निधी आणून विकास कामे केल्याचा दिखावा करणाऱ्या आमदारांचे सत्य यावरून उघड झाले आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, कर्जत, महाड, श्रीवर्धन, उरण, पनवेल या विधानसभा मतदार संघाची लोकसंख्या २६ लाखहून अधिक आहे. त्यामध्ये २४ लाख ८८ हजार ७८८ मतदार आहेत. जिल्हयात दोन हजारहून अधिक गावे, वाड्यांचा समावेश आहे. मतदारसंघातील स्थानिक विकासासाठी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधीची तरतूद केली जाते. या लोकप्रतिनिधींसाठी शासनाकडून प्रत्येकी पाच कोटी असे एकूण ३५ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली. आमदारांनी सुचविलेल्या ३६ कोटी रुपयांच्या २९० कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. प्रत्यक्षात २२ कोटी १२ लाख रुपयांचा निधी जिल्हा नियोजन समितीला शासनाकडून प्राप्त झाला. मात्र, लोकप्रतिनिधींनी आतापर्यंत १८ कोटी रुपयांचा निधी खर्च केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामध्ये अलिबाग विधानसभा मतदार संघातील •➤ पान ५ वर

## उपजिल्हा रुग्णालयात गरोदर महिलांची फरफट



■ प्रसूतीतज्ज्ञ नसल्याने आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार उघड

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीतज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे गरोदर महिलांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. कर्जतसाठी नेमलेले स्त्रीरोग तज्ज्ञ डॉक्टर गेल्या अनेक वर्षांपासून येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असल्याने कर्जत तालुक्यातील गोरगरीब व गरोदर महिलांना आरोग्य सेवेसाठी अक्षरशः वणवण करावी लागत आहे.

कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या आस्थापनेवरील प्रसूतीतज्ज्ञ डॉ. रामदास तरपेवाड यांना २०२३ साली उसनवारी तत्त्वावर माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. मात्र, त्यांचा पगार कर्जत येथूनच सुरू असूनही ते अद्याप माणगाव येथेच कार्यरत आहेत. परिणामी, कर्जत उपजिल्हा रुग्णालयात सध्या कायमस्वरूपी स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने आरोग्य व्यवस्थेतील गंभीर त्रुटी उघडकीस आली आहे.

प्रसूतीसारख्या संवेदनशील सेवेसाठी तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे अनेक वेळा खोपोली आणि कर्जत परिसरातील खासगी डॉक्टरांना बोलावावे लागते. काही वेळा गरोदर महिलांना नाईलाजास्तव खासगी रुग्णालयात जाऊन महागडे उपचार घ्यावे लागत असल्याने आर्थिक भारही सहन करावा लागत आहे. •➤ पान ५ वर

### वेधक

## शेअर बाजारात मोठी घसरण

**मुंबई :** नवीन आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोमवारी (दि.९) भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण झाली. मागील आठवड्यातील घसरणीची मालिकाही या आठवड्यातही सुरू झाली आहे. मध्यपूर्वेतील वाढत्या तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती झपाट्याने वाढल्याने गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आणि त्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही प्रमुख निर्देशांकांमध्ये जवळपास २ टक्क्यांची घसरण झाली. सकाळी बाजार जवळपास ३ टक्क्यांनी घसरून उघडला असला तरी दिवसाच्या शेवटी काही प्रमाणात सावरताना दिसला.

## पुनर्विकासाच्या बैठकीत गोंधळ

### मारहाणीने न्यू पनवेलमधील सोसायटीत तणाव

। पनवेल । प्रतिनिधी ।

सिडको वसाहतीतील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा मुद्दा तापत असतानाच न्यू पनवेलमधील एका गृहनिर्माण सोसायटीच्या बैठकीत मोठा गोंधळ उडाला. पुनर्विकासाच्या अटी व विकासकाच्या निवडीवरून सभासद आणि व्यवस्थापन समिती यांच्यात वाद वाढत जाऊन धक्काबुक्की व मारहाणीची घटना घडली. याप्रकरणी दोन्ही बाजूंनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, न्यू पनवेल येथील सेक्टर १४ मधील अम्रितवेल को.ऑ.हौसिंग सोसायटी (इमारत क्रमांक ई-१/१९) येथे इमारतीच्या पुनर्विकासाबाबत चर्चा करण्यासाठी सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. बैठकीदरम्यान पुनर्विकासाच्या अटी, प्रक्रिया तसेच विकासकाच्या निवडीवरून सभासद आणि सोसायटी व्यवस्थापन समिती यांच्यात तीव्र शाब्दिक वाद झाला. वाद वाढत गेल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण झाली आणि काही वेळातच धक्काबुक्कीची घटना घडली. यादरम्यान काही बाहेरील तरुण बैठकीत घुसल्याचा आरोप रहिवाशांकडून करण्यात आला आहे. या तरुणांनी उपस्थित काही नागरिकांना मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला असून, त्यामुळे सभेत एकच गोंधळ उडाला.

या घटनेत सोसायटीतील दोन रहिवासी जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी पनवेलमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तसेच, सोसायटी समिती आणि विकासक यांच्यात आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय काही रहिवाशांनी व्यक्त केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात तक्रारी दाखल केल्या असून, पोलिसांकडून या संपूर्ण घटनेची चौकशी सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

## आरटीई प्रवेशाच्या निर्णयाला स्थगिती

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारच्या आरटीई प्रवेशाच्या १ किमीचा अंतराचा निर्णय न्यायालयाने स्थगित केला आहे. याआधी सरकारच्या नव्या नियमानुसार आरटीई अंतर्गत शाळेत प्रवेश मिळवायचा असेल तर विद्यार्थ्याच्या निवासस्थानापासून १ किलोमीटर परिसरात असलेली शाळाच निवडता येत होती. सरकारच्या या निर्णयाला ॲड. बोधी रामटेके आणि ॲड. दीपक चटप यांनी आव्हान देत नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. याच याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. याच विषयाची याचिका सामाजिक •➤ पान ५ वर

## महाडमध्ये साहित्याचा जागर

■ दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

■ ग्रंथप्रेमींना मिळणार वैचारिक मेजवाणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

ग्रंथसंस्कृतीचा वारसा जपणे आणि वाचन चळवळ तळागाळापर्यंत पोहोचवणे, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय अलिबाग यांच्यावतीने ग्रंथोत्सव २०२६चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. महाड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथे दि.१२ व १३ मार्च रोजी हा ज्ञानोत्सव रंगणार आहे.

ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवशी गुरुवारी (दि.१२) सकाळी साडेनऊ वाजता भव्य ग्रंथदिंडी निघणार आहे. महाडचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर, उपविभागीय अधिकारी पोपटराव ओमासे आणि उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांच्या हस्ते या दिंडीचे उद्घाटन होईल. यावेळी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहायक ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील, पोलीस उपअधीक्षक शंकरराव काळे, शोभाताई सावंत, सीमाताई मपारा, गंगाधर साळवी आणि प्रकाश जमदाडे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असेल. सकाळी ११ वाजता मुख्य उद्घाटन समारंभ संपन्न होईल. या सोहळ्याला राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे आणि मंत्री भरत गोगावले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. याप्रसंगी खा. सुनील तटकरे, खा. श्रीरंग बारणे, खा. धैर्यशील पाटील आणि आ. रवींद्र पाटील, आ. महेंद्र थोरवे, आ. महेश बालदी, आ. निरंजन डावखरे, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे व आ. विक्रांत पाटील उपस्थित राहतील. प्रशासकीय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आणि पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांचीही उपस्थिती असेल.

या ग्रंथोत्सवात ग्रंथप्रेमींना दोन्ही दिवस वैचारिक मेजवानी मिळणार आहे. गुरुवारी ज्येष्ठ साहित्यिक ॲड. विलास नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सत्राचे आयोजन करण्यात आले असून, प्रभाकर भुस्कुटे आणि प्रा.डॉ. रवींद्र सोमोशी हे प्रमुख अतिथी असतील. दुपारी उत्कृष्ट वाचकांचा सन्मान आणि •➤ पान ५ वर

## कर्नाळा खिंडीत कंटेनर पलटी

**पनवेल :** मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेलजवळील कर्नाळा खिंड परिसरात सोमवारी (दि.९) सकाळच्या सुमारास मोठा अपघात झाला. भरधाव वेगात असलेला कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या मध्यभागी पलटी झाला. यावेळी कंटेनर रस्त्याच्या दुभाजकावर आदळल्याने मोठे नुकसान झाले. या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस व मदत पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तात्काळ वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू केले. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

## खांडस-अंबेरपाडा येथे जमिनीचे कुंपण तोडले



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील खांडस ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या अंबेरपाडा येथे एका खासगी जमिनीचे सिमेंटचे पोल आणि काटेरी तारांचे कुंपण अज्ञात व्यक्तिने तोडून नुकसान केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबेरपाडा गावात अलिशा मर्चंट यांच्या मालकीची जमीन आहे. या जमिनीच्या संरक्षणासाठी त्यांनी सिमेंटचे पोल •➤ पान ५ वर

## तरुणाची आत्महत्या

। पनवेल । प्रतिनिधी ।

२८ वर्षीय तरुणाने राहत्या घराच्या हॉलमधील सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अतुल वाघेला असे या तरुणाचे नाव असून, याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. अतुल वाघेला या तरुणाने आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. अतुलने नेमकी कोणत्या कारणावरून आत्महत्या केली याचे खरे कारण अद्याप समजू शकले नाही अतुल केलेल्या आत्महतेचे गुढ उकलण्यासाठी पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणाचा पुढील तपासाची सुत्रे हलविली आहेत.

## होळी उत्सवानंतर मच्छिमार पुन्हा समुद्रात

। आगरदांडा । प्रतिनिधी ।



● (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

होळी व धुळवडीचा उत्सव आनंदात साजरा करून मुरुड तालुक्यातील मच्छिमार बांधव पुन्हा खोल समुद्रात मासेमारीसाठी सज्ज झाले आहेत. उत्सवाच्या निमित्ताने आपल्या गावी परतलेल्या मच्छिमारांनी आता उदरनिर्वाहासाठी पुन्हा दर्याकडे मोर्चा वळवला आहे.

एकदरा कोळीवाड्यातील मच्छिमार बांधव रंगपंचमीचा उत्सव आटोपून खोल समुद्रात जाण्याची तयारीत मग्न असल्याचे चित्र सध्या किनाऱ्यावर दिसत आहे. एकदरा पुलाखाली ६ सिलिंडर असलेल्या सुमारे २५ बोटींचे नाखवे व खलाशी मासेमारीसाठी आवश्यक तयारी करण्यात व्यस्त आहेत. खोल समुद्रात मासेमारी करताना अनेक दिवस समुद्रातच राहावे लागते. त्यामुळे पकडलेली मासळी ताजी राहावी यासाठी बोटींमध्ये मोठ्या प्रमाणात बर्फ साठवण्याचे काम सुरू आहे. त्याचबरोबर डिझेल, महिनाभर पुरेल एवढे धान्य, खाद्यपदार्थ, औषधे तसेच इतर आवश्यक साहित्यही बोटींवर भरले जात आहे. वादळ, भरती-ओहोटी आणि विविध संकटांचा सामना करत उपजीविका करणारे हे मच्छिमार बांधव नव्या उमेदीने पुन्हा दर्यात उतरण्यास सज्ज झाले आहेत.

### अघोरी कृत्यांचा संशय | सुरक्षा रक्षक नेमण्याची मागणी

## कळंबोली स्मशानभूमीतील राख चोरीला

दीपक घरत

। पनवेल ।

कळंबोली गावातील स्मशानभूमीतून अंत्यसंस्कारानंतर राहिलेली राख चोरी होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. स्मशानभूमीसारख्या पवित्र आणि संवेदनशील ठिकाणी घडत असलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, अघोरी कृत्यांचा संशयही व्यक्त केला जात आहे.

काही दिवसांपासून अंत्यसंस्कार झाल्यानंतर स्मशानभूमीत ठेवण्यात आलेली राख दुसऱ्या दिवशी अचानक गायब होत असल्याचे लक्षात येत आहे. त्यामुळे हा प्रकार नेमका कोण करत आहे, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. स्थानिकांच्या मते, रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत काही अज्ञात व्यक्ती स्मशानभूमीत येऊन ही राख घेऊन जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकारामुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले असून, काही नागरिकांकडून अघोरी कृत्यांसाठी ही राख चोरी केली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. स्मशानभूमीसारख्या पवित्र स्थळी घडणाऱ्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना व्यक्त केली जात आहे.

> **पालिका हद्दीत एकूण ७९ स्मशान व दफनभूमी**
>
> पनवेल महानगरपालिका हद्दीत एकूण ७९ स्मशानभूमी व दफनभूमी असल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे. शहर आणि ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये या स्मशान व दफनभूमींची व्यवस्था करण्यात आली आहे.

या घटनेची माहिती समोर आल्यानंतर स्थानिक नगरसेवक रवींद्र भगत यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. स्मशानभूमी परिसरात कोणतीही ठोस सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे अशा प्रकारांना वाव मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले. रात्रीच्या वेळी कोणीही सहजपणे येथे प्रवेश करू शकत असल्याने हा प्रकार घडत असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. स्मशानभूमी परिसरात सुरक्षा रक्षकांची तातडीने नेमणूक करावी, सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, तसेच रात्रीच्या वेळी नियमित गस्त ठेवावी, अशी मागणी भगत यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे. पवित्र स्थळी घडणाऱ्या अशा घटनांमुळे नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.


> “ग्रामीण भागात मृतदेह दहन विधीचे प्रमाण तुलनेने कमी असल्यामुळे सर्व ठिकाणी कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक नेमलेले नाहीत. मात्र, नागरिकांकडून मागणी झाल्यास पालिकेकडून दहन विधीसाठी आवश्यक लाकडे पुरवली जातात.”
>
> – पालिका अधिकारी

## घारापुरी बेटावर पुरातत्व उत्खननाला वेग

### इतिहासावर नवा प्रकाशझोत पडण्याची शक्यता

। चिरनेर । प्रतिनिधी ।

ऐतिहासिक महत्त्व असलेल्या घारापुरील बेटावरील एलिफंटा लेण्यांच्या परिसरात भारतीय पुरातत्व विभागाकडून मागील ४ महिन्यांपासून उत्खननाचे काम सुरू आहे. हे काम येत्या मे महिन्याच्या अखेरपर्यंत सुरू राहणार आहे. या उत्खननातून घारापुरी बेटाच्या प्राचीन इतिहासाबाबत नवी माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



यापूर्वीही घारापुरी बेटावर विविध ठिकाणी करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पुरातन काळातील अनेक वस्तू आढळल्या आहेत. दळणकांड करण्यासाठी वापरण्यात येणारी साधने, मडकी, शिवलिंग तसेच विविध पुरातन वस्तूंचे भग्न अवशेष अनेकदा सापडले असल्यामुळे या परिसराचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित झाले आहे. त्यामुळे पुरातत्व सर्वेक्षण विभागाने बेटावर आणखी सखोल अभ्यास करण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयानंतर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी डिसेंबर २०२५ पासून घारापुरी बेटावर अधिक खोलवर अभ्यास करण्यासाठी उत्खननास सुरुवात केली आहे. शेतबंदर गावातील स्मशानभूमीपासून सीता गुंफेपर्यंत सुमारे १ हजार मीटर लांबीच्या नाल्यात आणि त्याच्या परिसरात मागील चार महिन्यांपासून उत्खननाचे काम सुरू आहे. हे उत्खनन येत्या मे २०२६ पर्यंत सुरू राहणार असून, या सर्वेक्षणातून आणि खोदकामातून घारापुरी बेटाच्या इतिहासावर अधिक प्रकाश पडण्यास मदत होईल, असा विश्वास भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. तसेच, उत्खननादरम्यान सापडलेल्या दुर्मिळ पुरातन वस्तू किंवा या कामाचे निष्कर्ष अधिकृत सर्वेक्षण पूर्ण होण्यापूर्वी जाहीर करणे योग्य ठरणार नसल्याचेही विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली

## शेकाप नेते मोहन गुंड यांचा आरोप

**। बीड । प्रतिनिधी ।**

राज्याच्या अर्थसंकल्पात शेकतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा करण्यात आली. मात्र, ही जाहीर करण्यात आलेली शेतकऱ्यांची कर्जमाफी ही अपुरी आणि दिशाभूल करणारी असल्याचा घणाघात शेतकरी कामगार पक्षाचे नेते मोहन गुंड यांनी केला आहे. ज्या शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे कर्जाची पै न पै फेडली, त्यांना कोणतीही दिलासा योजना नाही; मात्र ज्यांनी कर्ज भरलेले नाही, अशांची कर्जमाफी केली जात आहे. ही भूमिका अन्यायकारक असून, सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केल्याचा आरोप देखील मोहन गुंड यांनी केला आहे.



शेतकऱ्यांना प्रत्यक्षात सरसकट कर्जमाफीची अपेक्षा होती. अनेक शेतकऱ्यांनी घरातील पशुधन विकून, कुटुंबाची गरज बाजूला ठेवून बँकांचे कर्ज फेडले आहे. बँकेचे अधिकारी कधीही दारात येऊन उभे राहतील याची भीती असल्याने त्यांनी कसोशीने कर्ज फेडले. मात्र, अशा प्रामाणिक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळत नसेल, तर ती गंभीर बाब असल्याचे मोहन गुंड यांनी स्पष्ट केले.

आज राज्यातील शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. कर्जबाजारीपणाला कंटाळून दररोज दोन-चार शेतकरी आत्महत्या करत असल्याचे चित्र दिसत आहे. या गंभीर प्रश्नाचा गांभीर्याने विचार करून ठोस निर्णय घेण्याची गरज असताना सरकारकडून केवळ घोषणाबाजी होत असल्याची टीकाही मोहन गुंड यांनी केली. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असताना मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ नेमके किती दिवस अभ्यास करत राहणार, असा सवालही मोहन गुंड यांनी उपस्थित केला. या प्रश्नावर किती दिवस समित्या स्थापन केल्या जाणार, याचे स्पष्ट उत्तर सरकारने द्यावे, अशी मागणी देखील मोहन गुंड यांनी केली.

दरम्यान, अर्थसंकल्पातील कर्जमाफीच्या घोषणेवर आम्ही समाधानी नसून, तिचा तीव्र निषेध करत आहोत, असेही मोहन गुंड यांनी स्पष्ट केले. संपूर्ण कर्जमाफीचा निर्णय तातडीने घेतला नाही, तर शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने राज्यभर जनजागृती करून सरकारविरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

---

अर्जदारातर्फे वकील
एम. पी. वेंगुर्लेकर.

**अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. २७/२०२६
निशाणी क्र. ७/ड

श्री. विजय राघो पाटील वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, सदरील अर्जदार क्र.१ ची पत्नी व २ व ३ ची आई कै. वंदना विजय पाटील या दि.२८/०१/२०२४ रोजी अलिबाग येथील त्यांच्या राहत्या घरी मयत झालेल्या आहेत. कै.वंदना विजय पाटील यांच्या नावे व त्यांच्या मालकीचा अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मौजे चेंढरे, रामनाथ रोड, ता.अलिबाग, जि. रायगड येथील रघुकुल को. ऑप. हौ. सोसायटी लि. मधील पहिल्या मजल्यावरील डी विंग मधील निवासी सदनिका क्र.१११, एकुण क्षेत्र (३५.४४) चौ.मी, (६२५ चौ.फुट) अलिबाग नगरपालिकाकडील मालमत्ता क्र. Z1BHA001924 (जुना मालमत्ता क्र.१५९६ क/डी/विंग) हा अर्जदारांच्या नावे होण्याकामी तसेच त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार हे त्यांचे वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळण्याकरिता बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७,VIII अन्वये मा.न्यायालयाकडे दि. /०२/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करावयाची असल्यास अशा लोकांनी दि. ०८/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः वा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधीमार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि. ०८/०४/२०२६ रोजी वा तत्पूर्वी सदर वारस दाखला देणे बाबतच्या अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना आवश्यक तो वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.२८ माहे फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही /-
**लिपीक**
**दिवाणी न्यायालय व स्त.**
**अलिबाग- रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्त.**
**अलिबाग- रायगड**

---

### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे गुंजिस, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक समित सतिश नाईक व सतिश मोरेश्वर नाईक यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे गुंजिस, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| गुंजिस ता.अलिबाग | ३८/५ | ०-०६-८०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकुण ०-०७-६० | १.६२ |
| | ३८/४ | ०-१५-४क्र०<br>पो.ख. ०-०२-००<br>एकुण ०-१७-४०<br>पैकी खाते क्र.२२०क्षेत्र ०-०२-४५ | ३.८७ |

वर नमुद जमिन मिळकती व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत बोरीस गुंजिस हद्दीतील घर मालमत्ता क्र. १) २३२,२) २७४, ३) २७५ या मिळकतींबाबतचे

दिनांक : १०/०३/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

---




## प्लास्टिक मुक्तीसाठी पुढाकार

**। उरण । प्रतिनिधी ।**

लग्नात किंवा सार्वजनिक कार्यात प्लास्टिक पत्रावळी आणि प्लास्टिक ग्लास यांचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. शरीराला हानिकारण असणाऱ्या प्लास्टिक पत्रावळी पासून व ग्लास पासून कॅन्सर सारख्या भयानक रोगाला आमंत्रण दिले जात आहे. यावर एक जालीम उपाय म्हणून आर्यन ग्रुप ऑफ कंपनी चिर्लेचे डायरेक्ट समीर पाटील यांच्या डोक्यात एक कल्पना आली. त्यांनी महिला दिनाचे औचित्य साधुन सारडे गावातील श्री राधाकृष्ण महिला गटाला २०० स्टील ताट आणि २०० स्टिल ग्लास देण्यात आली आहेत. अगदी कमी भाडे आकारून या गटातर्फे ही ताटं आणि ग्लास गावातील हळदी, लग्न, पूजा किंवा इतर सार्वजनिक कार्यास दिली जाणार आहेत. समीर पाटील यांनी प्लास्टिक मुक्त सारडे गावासाठी पहिले पाऊल उचलले आहे. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरावरून कौतुक केले जात आहे.

---

### जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलानी मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जयवंत नारायण ठाकूर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वरंडे<br>ता. अलिबाग<br>जि. रायगड | २४५ | क्षेत्र ०-१८-७०<br>पो.ख. ००-०२-५०<br>एकूण ००-२१-२० | ४.५६ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करारमदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ०९/०३/२०२६

**ॲड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

---



## चिरनेरमधील शेतकरी आक्रमक

**। उरण-चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनीवर हिंद टर्मिनल्स सीएफएस कंपनी उभारण्यात आली आहे. या कंपनीसाठी येथील ४० शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत. या कंपनीने बाधित प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांसह स्थानिक भूमिपुत्रांना कंपनीमध्ये सामावून घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, कंपनी सुरू होऊन एक महिन्यापेक्षा जास्त दिवस उलटून देखील कंपनीत प्रकल्पग्रस्त व बाधित शेतकऱ्यांच्या वारसांसह स्थानिकांना कंपनीने कामावर रूजू करून घेतलेले नाही. याउलट मुजोर कंपनीने ३० जानेवारी रोजी सुमारे २०० कामगार बाहेरून आणून कंपनी चालू केली आहे. विशेषता: स्थानिक एकही कामगार आम्ही कंपनीत कामावर घेणार नाही ही ठाम भूमिका कंपनीने घेतली आहे. स्थानिकांना कंपनी विरोधात जे काय करायचे असेल ते करू शकता. अशी कंपनी प्रशासनाने बाधित शेतकरी स्थानिकांना धमकी देखील दिली आहे. कंपनी प्रशासनाने शेतकऱ्यांची दिशाभूल व मनमानी करून, शेतकऱ्यांवर व भूमिपुत्रांवर मोठा अन्याय केला असून शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करण्याचा डाव कंपनीने अवलंबिला आहे. त्यामुळे येथील भूमिपुत्रांनी संताप व्यक्त केला असून, भूमिपुत्र शेतकरी कंपनी प्रशासनाविरोधात न्याय हक्क मागण्यासाठी आक्रमक झाला आहे. त्यासाठी मंगळवारी (दि.१०) दोन्ही गावचे भूमिपुत्र शेतकरी एकत्र येत, मुजोर कंपनीच्या विरोधात प्रवेशद्वारासमोर भूमिपुत्रांना योग्य तो न्याय मिळेपर्यंत बेमुदत आंदोलन करण्यासाठी सज्ज झाले आहेत. या आंदोलनाचे लेखी निवेदन पोलीस आयुक्त नवी मुंबई, पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ बेलापूर, सहाय्यक पोलीस आयुक्त न्हावाशेवा बंदर उरण, जिल्हाधिकारी रायगड, उरण तहसीलदार, उपअभियंता सा.बा. विभाग उरण या संबंधित खात्यांना देण्यात आले आहे.

---

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, आम्ही **(१) दरायस फली कावराणा**, ज्यांचा पत्ता डी३, पाल्लोनजी मॅन्शन, ४३ कफ परेड, मुंबई - ४००००५, आणि **(२) झाल फली कावराणा**, जांचा पत्ता बी४ पाल्लोनजी मॅन्शन, ४३ कफ परेड, मुंबई - ४००००५ असा आहे (एकत्रितपणे **"मालक"**), यांच्या यात खाली लिहिलेल्या परिशिष्टामध्ये अधिक विशेषरित्या वर्णन केलेला मालमत्तेच्या (**"मालमत्ता"**) संबंधातील अधिकार, हक्क आणि हितसंबंधांची चौकशी करीत आहोत.

**यात यावरील संदर्भित केलेले परिशिष्ट :**

**कोणत्याही** आणि सर्व व्यक्ती (कोणत्याही बँका किंवा वित्तीय संस्था किंवा एनबीएफसी किंवा इतर कोणत्याही कर्जदात्यासह) यांना सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, मृत्युपत्र, धारणाधिकार, आकार, गहाण (समन्याय किंवा अन्य) बक्षिस, न्यास, मृत्युपत्रीत देणगी, वारसा, कब्जा, भाडे, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांकन, भाडेदारी, पोट-भाडेदारी अनुज्ञप्ती, काळजीवाहू तत्व, भागीदारी विलेख, सुविधा अधिकार, विभाजन, कर्ज, प्राप्य वस्तूंचे तारण गहाण, हमी, एकाधिकार, परिरक्षा, भोगवटा, अधित्याग, अधित्यजन किंवा कोणताही करारनामा, विलेख, दस्तऐवज, लिखित, उत्तराधिकार, कुटुंब व्यवस्था/तडजोड, विवाद, प्रलंबित वाद, कोणत्याही न्यायालयाचा हुकुमनामा किंवा आदेश, कोणत्याही प्राधिकरणाने संमत केलेला निवाडा किंवा कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा कायद्याच्या प्रचालनाद्वारे, करार, विकास अधिकार किंवा एफएसआय वापर किंवा टीडीआर किंवा भार किंवा अधिकार, संभाव्य विकास वापरण्याचे अधिकार व प्रसंविदा किंवा लाभाधिकारी अधिकार, कोणत्याही न्यासा खालील हितसंबंध, चीर्भोगाधिकार किंवा अग्रक्रयाधिकार, कोणत्याही स्वरूपाचे अन्य काही असेल तर किंवा यात यावर नमूद केलेले या मालकांचे हक्क विलेख आणि/किंवा मालमत्ता किंवा त्यातील कोणताही भाग याद्वारे सदर मालमत्तेच्या किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संबंधातील कोणताही अधिकार, हक्क, शेअर, दावा, लाभ, आक्षेप, इस्टेट, मागणी आणि/किंवा हितसंबंध (''दावे'') असणाऱ्या कोणत्याही आणि सर्व व्यक्तींनी (कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा एनबीएफसी किंवा अन्य कोणतेही ऋणको यांच्या समावेशासह) आम्हाला या जाहिरातीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत यात याखाली नमूद केलेल्या पत्त्यावर या दाव्याच्या हार्ड कॉपीसह objections@veritaslegal.in वर पाठींबा देणाऱ्या दस्तावेजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. यात कसूर झाल्यास अशा व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे दावे/तथाकथित दावे/आक्षेप दुर्लक्षित करण्यात येतील किंवा सर्व आशा आणि उद्देशाकरिता त्यांचा अधित्याग किंवा परित्याग करण्यात आलेला आहे, असे समजण्यात येईल आणि ते कोणत्याही पद्धतीने बंधनकारक राहणार नाहीत.

**(मालमत्तेचे वर्णन)**

तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथील कृषी जमिनीचे ते सर्व तुकडे आणि भाग खालीलप्रमाणे :

| अनु. क्र. | मालकाचे नाव | गट क्र. | गांव | क्षेत्रफळ (७/१२ उताऱ्यानुसार) | सीमा |
|---|---|---|---|---|---|
| १ | दरायस फली कावराणा | ८५ | सुरेखर | ०-३५-२० हे.आर. | पूर्वेस : गट क्र. ८३ व ८४.<br>पश्चिमेस : गट क्र. ८६ व ८७.<br>उत्तरेस : गट क्र. ८२.<br>दक्षिणेस : गट क्र. ८८. |
| २ | दरायस फली कावराणा | ८६ | सुरेखर | ०-१८-२० हे.आर. | पूर्वेस : गट क्र. ८५.<br>पश्चिमेस : गट क्र. ९४.<br>उत्तरेस : गट क्र. ९४.<br>दक्षिणेस : गट क्र. ८७. |
| ३ | दरायस फली कावराणा | ८७ | सुरेखर | ०-२०-२० हे.आर. | पूर्वेस : गट क्र. ८५.<br>पश्चिमेस : गट क्र. ९४.<br>उत्तरेस : गट क्र. ८६.<br>दक्षिणेस : गट क्र. ८८. |
| ४ | दरायस फली कावराणा | ८८ | सुरेखर | ०-९५-१० हे.आर. | पूर्वेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६२.<br>पश्चिमेस : गट क्र. ९४.<br>उत्तरेस : गट क्र. ७९, ८४, ८५ व ८७.<br>दक्षिणेस : गट क्र. ८९. |
| ५ | झाल फली कावराणा | ८९ | सुरेखर | ०-७८-२० हे.आर. | पूर्वेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६१ व २६२.<br>पश्चिमेस : गट क्र. ९० व ९४ (भाग).<br>उत्तरेस : गट क्र. ८८.<br>दक्षिणेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. ९० व गट क्र. २६० (भाग). |
| ६ | झाल फली कावराणा | २६१ | आगरसुरे | ०-२७-० हे.आर. | पूर्वेस : रस्ता.<br>पश्चिमेस : गांव सुरेखर येथील गट क्र. ८९.<br>उत्तरेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६२ व गांव सुरेखर येथील गट क्र. ८८.<br>दक्षिणेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६०. |
| ७ | दरायस फली कावराणा | २६२ | आगरसुरे | ०-१७-० हे.आर. | पूर्वेस : रस्ता.<br>पश्चिमेस : गांव सुरेखर येथील गट क्र. ८८.<br>उत्तरेस : गांव आगरसुरे येथील गट क्र. २६३ व गांव सुरेखर येथील गट क्र. ७९.<br>दक्षिणेस : गट क्र. २६१. |

मालमत्तेवर उभ्या असलेल्या घर क्र. १३६९ आणि १३७० आणि इतर इमारतींसह (उदा., गट क्र. ८५, ८७, ८८ आणि २६२), आणि त्यावर असलेल्या झाडे, इतर वृक्षारोपण, विहीर आणि बोअरवेलसह.

आज दिनांक १० मार्च, २०२६

**व्हेरिटास लीगल करीता**
वकील आणि सॉलिसिटर्स

**सही/–**
**रुस्तम मुल्ला**
भागीदार
objections@veritaslegal.in

फोर्ब्स बिल्डिंग, पहिला मजला,
चरणजीत राय मार्ग,
फोर्ट, मुंबई – ४००००१.

---

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**कार्यकारी अभियंता, (विद्युत) यांचे कार्यालय**
**रायगड विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग रायगड,**
**सार्वजनिक बांधकाम आवार-पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन - ४०२१०७**

Email : elraigad.ee@mahapwd.gov.in / elraigad.ee@gmail.com
Website : www.mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८

**जा क्र.का.अ./राविवि/निविदा -१/७८०/ सन २०२६** — दिनांक : ०५.०३.२०२६

**ई-निविदा सुचना क्र. २६ सन २०२५-२६**

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन सा.बां. विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र. सीएटी २०१७/प्र.क्र.८/इमारती-२ दिनांक २७ सप्टेंबर २०१८

कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा. बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र.०२१४३- २९९२८८ हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील टक्केवारी दर (Percentage Rate) ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर : https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड - ४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३-२९९२८८ यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु. | ई-निविदा उपलब्ध कालावधी | निविदापूर्व बैठक/ ठेकेदारांचा वर्ग/ इसारा रक्कम/कोरा निविदा शुल्क | ई-निविदा उघडणे |
|---|---|---|---|---|---|
| | **द्वितीय मागणी** | | | | |
| ०१ | RAESD/OW / 231 / 2025-26 Providing Solar On-grid & Solar High-mast system for Rural Hospital Shriwardhan, Tal -Shriwardhan, Dist - Raigad. | ₹ 37,20,406/- | दि.११.०३.२०२६ सकाळी १०:०० ते दि. १८.०३.२०२६ सायंकाळी १८:०० | १) निविदापूर्व बैठक नाही.<br>२) निविदेमधील लिफाफा क्र.१ मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी.<br>३) इसारा रक्कम रु.३८०००/-<br>४) निविदा शुल्क रु. ५९०/- | दिनांक २०.०३.२०२६ सकाळी ११:०० |
| ०२ | RAESD/OW / 234 / 2025-26 Providing Solar On-grid & Solar High-mast system for Rural Hospital mhasala, Tal-mhasala,Dist - Raigad. | ₹ 19,40,795/- | दि.११.०३.२०२६ सकाळी १०:०० ते दि. १८.०३.२०२६ सायंकाळी १८:०० | १) निविदापूर्व बैठक नाही.<br>२) निविदेमधील लिफाफा क्र.१ मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी.<br>३) इसारा रक्कम रु.२००००/-<br>४) निविदा शुल्क रु. ५९०/- | दिनांक २०.०३.२०२६ सकाळी ११:०० |
| | **प्रथम मागणी** | | | | |
| ०३ | RAESD/OW / 244 / 2025-26 Providing Dewatering pump & internal electrical work for New Admin Building Panvel Tal-Panvel,Dist-Raigad | ₹ 21,17,645/- | दि.११.०३.२०२६ सकाळी १०:०० ते दि. १८.०३.२०२६ सायंकाळी १८:०० | १) निविदापूर्व बैठक नाही.<br>२) निविदेमधील लिफाफा क्र.१ मध्ये दर्शविलेली सर्व कागदपत्रे सादर करावी.<br>३) इसारा रक्कम रु.२२०००/-<br>४) निविदा शुल्क रु. ५९०/- | दिनांक २०.०३.२०२६ सकाळी ११:०० |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१ https://mahatenders.gov.in (सदर निविदासुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल)
२ कार्यकारी अभियंता, रायगड विद्युत विभाग, सा.बां. रायगड, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयामागे, सा.बां. परिसर- पेण, ता. पेण, जि. रायगड, पिन कोड-४०२१०७ दुरध्वनी क्र. ०२१४३- २९९२८८ या कार्यालयातील सुचना फलक
३. वरील कामांकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये नोंदणीकृत विद्युत ठेकेदार व उद्योग, उर्जा व कामगार विभागाकडील विद्युत अनुज्ञाप्तीधारक विद्युत ठेकेदार यासह ज्यांना तत्सम प्रकारचे काम यशस्वीपणे पुर्ण केल्याचा अनुभव आहे. असे कंत्राटदार निविदा सादर करु शकतात. (अनुभवाचे प्रमाणपत्र लिफाफा क्र.१ मध्ये जोडण्यात यावे.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहे.

सही/-
**(प्र.अ.दोडे)**
**कार्यकारी अभियंता,**
**रायगड विद्युत विभाग,**
**सा.बां.पेण- रायगड**

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/३२४**

---

सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**मौजे कामोठे येथील निवाडा क्र. ३८८ व निवाडा क्र. १७६ मध्ये संचालक मंडळाचा ठराव क्र.९४९७ दि.१०.१०.२००६ नुसार "गावकरी वहिवाटदार" साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड वाटपासाठी पात्रता मंजूर करणेबाबत.**

मौजे कामोठे ग्रामस्थांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सिडको महामंडळाच्या भूमी विभागाकडून भूधारक (१) श्री. चंद्रकांत धोंडू म्हात्रे (२) श्री. मारूती आल्या शिरढोणकर (३) श्री. शंकर गणू जोशी (४) श्री. आत्माराम रामा भेंडे व (५) श्री. सिताराम बाळाराम कडूरा, कामोठे, ता. पनवेल. जि. रायगड यांना महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार "आगरी समाज पंच वहिवाटदार" या संवर्गातुन खालील वर्णनाच्या संपादित जमिनीपोटी व संबंधीत कागदपत्रान्वये इकडील संचिका क्र. ३४०, कामोठे साडेबारा टक्के योजनेंतर्गत १९५० चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंड वाटपास पात्र ठरतात.

| अ.क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे नं. /हिस्सा नं. | संपादित क्षेत्र | भूधारक / वहिवाटदाराचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | कामोठे ३८८ | २४३/६ | ०-०२-० | आगरी समाज पंच वहिवाटदार<br>१. श्री. चंद्रकांत धोंडू म्हात्रे<br>२. श्री. मारूती आल्या शिरढोणकर<br>३. श्री. शंकर गणू जोशी<br>४. श्री. आत्माराम रामा भेंडे<br>५. श्री. सिताराम बाळाराम कडू |
| | | २३६/१+२+३/२ | ०-५९-७ | |
| | | २३७/४ | ०-०६-७ | |
| | | २३२/६+८+९+१०+११+१२+१३ B | ०-२४-१ | |
| | | २३४/५ | ०-०८-३ | |
| | | २३५/० | ०-५२-१ | |
| | | २४१/२P | ०-१०-५ | |
| | | २४१/३ | ०-२८-० | |
| | | २४२/१+६ | ०-११-९ | |
| २ | कामोठे १७६ | २३७/१ | ०-१२-० | |
| | | २३७/२ | ०-०८-४ | |

सदर जमीन "आगरी समाज पंच वहिवाटदार" या संवर्गातील असल्याकारणाने व धोरणातील तरतूदीनुसार आपणांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, उपरोक्त संपादित जमिनीपोटी साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूधारक (१) श्री. चंद्रकांत धोंडू म्हात्रे, (२) श्री. मारूती आल्या शिरढोणकर, (३) श्री. शंकर गणू जोशी, (४) श्री. आत्माराम रामा भेंडे व (५) श्री. सिताराम बाळाराम कडूरा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड यांस साडेबारा टक्के योजनेंतर्गत भूखंड वाटपास आपली काही हरकत असल्यास, आपल्या हक्कासंबंधात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत सक्षम न्यायालय / प्राधिकरण यांचेकडून प्राप्त झालेल्या पुराव्यांसह या कार्यालयास कळविण्यात यावे.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**सिडको/जनसंपर्क/५४०/२०२५-२६**

## निवडक

### गरीबांचा 'फ्रीज' बाजारात दाखल



**पाताळगंगा :** उन्हाची चाहूल लागताच गरीबांचा 'फ्रीज' म्हणून ओळखला जाणारा माठ पुन्हा बाजारात दिसू लागला असून त्याची मागणी वाढू लागली आहे. उन्हाळा सुरू होताच अनेक नागरिक माठ खरेदी करताना दिसत आहेत. माठातील पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते आणि ते आरोग्यासाठीही लाभदायक मानले जाते. त्यामुळे आजही अनेक घरांमध्ये उन्हाळ्यात माठाचा वापर केला जातो. होळीनंतर तापमानात वाढ होत असून, उन्हाची दाहकता वाढू लागली आहे. त्यामुळे माठाचे महत्त्व कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात सर्वसामान्यांची तहान भागविण्यासाठी माठाचा वापर पाणपोई, हॉटेल तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी केला जातो. तालुक्यातही उन्हाच्या झळा जाणवू लागल्याने माठांची मागणी वाढू लागली आहे. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला उन्हाचा तडाखा सौम्य होता; मात्र होळीनंतर तापमानात वाढ होत असून, यंदाचा उन्हाळा तीव्र असण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. उन्हाळ्यात तहान भागवण्यासाठी अनेकजण थंड पेयांकडे वळतात; मात्र फ्रीजमधील पाणी काहींना त्रासदायक ठरते. त्यामुळे अनेक नागरिक माठ खरेदी करण्यास प्राधान्य देतात. यामुळे कुंभार समाजालाही रोजगार मिळतो. दरवर्षी उन्हाळ्यात माठाला मोठी मागणी असते. श्रीमंतांपासून सर्वसामान्यांपर्यंत सर्वांनाच माठातील थंडगार आणि गोडसर चवीचे पाणी आवडते. त्यामुळेच माठाला 'गरीबांचा फ्रीज' असे संबोधले जाते.

### उन्हामुळे कलिंगडाला पसंती



**तळा :** वाढत्या उष्णतेमुळे अंगाला चटके बसत असताना शरीराला थंडावा मिळावा यासाठी नागरिकांची पावले आता कलिंगड खरेदीकडे वळताना दिसत आहेत. तळा शहरात सध्या मोठ्या प्रमाणावर कलिंगड विक्रीसाठी आले असून, नागरिकांकडून त्याला चांगली मागणी मिळत आहे.तळा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर कलिंगडाची लागवड केली जाते. तालुक्यातील वानस्ते, आमडोशी, बोरघर, बेलघर, पाचघर आदी गावे कलिंगडाच्या शेतीसाठी ही गावे कलिंगडाच्या शेतीसाठी प्रसिद्ध आहेत. दरवर्षी तालुक्यात सुमारे ३०० ते ४०० हेक्टर क्षेत्रावर कलिंगडाची लागवड केली जाते. चविष्ट आणि दर्जेदार उत्पादनामुळे तालुक्यातील कलिंगडाला जिल्हाभरात मोठी मागणी असते. कलिंगडाचे पीक तयार झाल्यानंतर व्यापारी थेट शेतात जाऊन खरेदी करतात. गेल्या वर्षी प्रतिक्विंटल पाच ते सहा हजार रुपयांचा दर असलेले कलिंगड यावर्षी दुपटीने महागले असून, सध्या प्रतिक्विंटल दहा ते अकरा हजार रुपये दराने विक्री होत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. प्रतिहेक्टर सुमारे २०० ते ३०० क्विंटल उत्पादन मिळते. रब्बी हंगामात बागायती पीक म्हणून कलिंगडाची लागवड केली जाते. सध्या तापमानात मोठी वाढ झाल्याने उष्णतेपासून दिलासा मिळावा म्हणून नागरिकांकडून कलिंगड खरेदीला अधिक पसंती मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



### कर्जतमध्ये संत तुकाराम बीज उत्साहात

**कर्जत :** कर्जत शहरातील मुद्रे (बुद्रुक) गावामध्ये दरवर्षी प्रमाणे यंदाही संत शिरोमणी तुकाराम महाराज बीज उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी वारकरी बंधू-भगिनींनी फुगड्या, मृदूंगाच्या तालावर पालखी मिरवणूक काढून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सकाळी संत तुकाराम महाराजांचे मूर्ती पूजन भूषण प्रधान व सौ. रेश्मा प्रधान या नव दांपत्याच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थ मंडळ मुद्रेच्या युवकांनी संगीत भजने सादर केली. श्री भैरवनाथ मंदिर पासून फुले उधळीत गावातून पालखी काढण्यात आली. महाप्रसादाने सोहळ्याची सांगता झाली. याप्रसंगी नगराध्यक्ष पुष्पा दगडे, संतोष पाटील, महेंद्र चंदन, अंजली कडू, मानसी कानिटकर, मधुरा चंदन, भारती पालकर, सदाशिव बैलमारे, भानुदास पालकर, अतुल कडू, अंकुश मोधळे, राजेश पाटील, सोमनाथ पालकर, अरुण बैलमारे, दिलीप बैलमारे, शशिकांत बैलमारे, सुमित बैलमारे, सुदाम तवळे, संदीप बुवा पाटील, समीर बुवा दिसले, रवींद्र मोधळे यांच्यासह वारकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कॉपर वायरची चोरी करणाऱ्या त्रिकुटाला ठोकल्या बेड्या

**पनवेल :** नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंपामध्ये असलेल्या एक लाख रुपये किमतीच्या कॉपर वायरची चोरी करणाऱ्या त्रिकुटाला पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून काही प्रमाणात चोरीला गेलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी हस्तगत करण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यातील सोमाटणे गावाच्या हद्दीत नव्याने काम चालू असलेल्या पेट्रोलपंपामध्ये बसवण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरमधून अज्ञात चोरट्यांनी सुमरे एक लाख रुपयांच्या कॉपर वायरची चोरी केल्याची घटना घडली होती. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गिजे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत, पोहवा धुमाळ, देवरे, कुदळे, बाबर, तांडेल, महारसे, भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने आरोपी अनिल यादव (२५), अवधेश मोर्या (१९) आणि विष्णु चौरासिया (४४) तिघेही राहणार नेरेपाडा यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबूल केले. पोलिसांनी त्यांच्याकडून काही प्रमाणात चोरीला गेलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली गाडी हस्तगत केली आहे.

# वाढत्या उष्णतेमुळे मोहर करपला

- **फळधारणा गळतीमुळे आंबा बागायतदार चिंतेत**
- **शासनाकडून आर्थिक दिलासा मिळण्याची मागणी**

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे रायगडसह उरण तालुक्यातील आंबा पीक धोक्यात आले असून, शेतकरी चिंतेत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाच्या कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यात तांत्रिक मार्गदर्शन व उपाययोजना करण्यासाठी कृषी शास्त्रज्ञ विविध तालुक्यांतील आंबा बागांना भेटी देत आहेत.

याच अनुषंगाने सहयोगी प्राध्यापक डॉ. व्ही.पी. दामोदर, कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ डॉ. व्ही.पी. सावंत, पीक संरक्षण विषयातील शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर, उरण तालुका कृषी अधिकारी ऋतुजा सुळ, कृषी पर्यवेक्षिका बरकूल, कृषी सहाय्यक अधिकारी सुषमा अंबुलगेकर, कृषी सहाय्यक अधिकारी सूरज घरत तसेच कृषी सहाय्यक अधिकारी भजनावळे यांनी येथील आंबा बागायतदारांच्या बागांना भेट देऊन पाहणी केली. या पाहणीत परतीचा पाऊस लांबल्यामुळे आंबा पिकावर प्रतिकूल परिणाम झाल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून हवामानात अचानक बदल होत असल्याने तालुक्यातील आंबा बागांवर विपरीत परिणाम झाला आहे. यंदा परतीचा पाऊस उशिरापर्यंत सुरू राहिल्याने आंबा झाडांना मोहर उशिरा आला. त्यातच पावसामुळे ऑक्टोबर महिन्यात अपेक्षित उष्णता न मिळाल्याने मोहर व्यवस्थित फुलला नाही.



> "कृषी विभागाने केवळ पाहणी करून थांबणे पुरेसे नाही. नुकसानग्रस्त आंबा बागांची तातडीने पंचनामे करून त्याचा अहवाल शासनाकडे पाठवावा. तसेच आंबा बागायतदार शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत मिळवून द्यावी. तरच शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने आर्थिक दिलासा मिळेल."
>
> – प्रफुल्ल खारपाटील, शेतकरी

डिसेंबर महिन्यात योग्य प्रमाणात थंडी पडल्याने झाडांना चांगला मोहर आला होता आणि बागायतदारांनाही समाधानकारक उत्पादनाची अपेक्षा होती. मात्र, जानेवारी अखेरपासून हवामानात झालेल्या बदलामुळे परागीकरणावर परिणाम झाला. काही ठिकाणी पुन्हा मोहर दिसून आला; परंतु अचानक वाढलेल्या तापमानामुळे झाडांवरील उरलेला मोहर करपून गेला. याआधी लागलेली फळधारणादेखील कमी झाली असून, लहान फळे गळू लागल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सध्या दिवसा उन्हाचा कडाका वाढू लागल्याने वाढत्या उष्णतेचा परिणाम मोहरावर होत असून, तो काळवंडू लागला आहे. यासोबतच थ्रिप्स व तुडतुडे यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. महागडी औषधे फवारूनही आंबा पिकावरील किडी पूर्णपणे नियंत्रणात येत नसल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर शासनाच्या निर्देशानुसार कृषी विभागाने तालुक्यातील आंबा बागायतदारांना नुकसानभरपाईच्या माध्यमातून योग्य ती आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

## मैदानात आग

**| पनवेल | प्रतिनिधी |**

खारघर सेक्टर ३५ पॅराडाईज सोसायटी आणि तळोजा सेक्टर १६ आस्था पॅलेस सोसायटीलगत असलेल्या मोकळ्या मैदानातील वाळलेल्या गवताला अचानक आग लागल्याची दुर्घटना घडली आहे. खारघर अग्निशमन जवानांनी धाव घेत ही आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला. खारघर सेक्टर ३५ पॅराडाईज सोसायटीलगत असलेल्या मैदानातील गवताला, तर तळोजा फेज -२ आस्था पॅलेस सोसायटीलगत मैदानात साचलेल्या कोरड्या गवताला आग लागली. या दुर्घटनांची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले.

## उरणमध्ये १४ ग्रामपंचायतींवर प्रशासक

**| उरण | प्रतिनिधी |**

तालुक्यातील १४ ग्रामपंचायतींची मुदत संपली असून, या ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासक पाहात आहेत. त्यामुळे या ग्रामपंचायत हद्दीतील जनहिताचे काही प्रश्न आजही रेंगाळत पडले असल्याने या ग्रामपंचायतींच्या निवडणुका कधी जाहीर होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

उरण तालुक्याचे औद्योगिकरण व नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. या तालुक्यातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम हे तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य हे करत आहेत. मात्र तालुक्यातील विंधणे, बांधपाडा, मोठी जुई, हनुमान कोळीवाडा कोप्रोली, सोनारी, चाणजे, केगाव, गोवठणे, फुंडे, म्हातवली, नागाव, वेश्वी, आवरे आदी १४ ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे. त्यातील विंधणे, बांधपाडा, मोठी जुई, हनुमान कोळीवाडा, कोप्रोली या ग्रामपंचायतींची मुदत ही दोन वर्षांअगोदरच संपल्याने प्रशासक कामकाज पाहात आहेत. एकंदरीत, २०२५-२६ या वर्षात मुदत संपलेल्या तालुक्यातील १४ ग्रामपंचायतीचा कारभार हा प्रशासक पाहात असल्याने स्थानिक सरपंच व सदस्यांच्या अनुपस्थितीत गावपातळीवरील विकासकामे रेंगाळत पडत आहेत. तरी, या ग्रामपंचायतींच्या निवडणुका लवकरच लवकर पार पडाव्या, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आंबेत बसस्थानकात जीवघेणा सापळा

- **मोरीचे बांधकाम धोकादायक**
- **प्रवासी, वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न**





**| म्हसळा | प्रतिनिधी |**

गोरगरिबांचे कैवारी म्हणून ओळखले जाणारे माजी मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांच्या जन्मगावी असलेल्या आंबेत येथील बसस्थानक परिसरात धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या महाड-रायगड विभागातील या बसस्थानकात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी बांधण्यात आलेली मोरी उघडी पडली असून, तिच्यावर ठेवलेले लोखंडी जाळेही विस्कटलेल्या अवस्थेत आहे. त्यामुळे प्रवासी, वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

या बस स्थानकात ये-जा करणाऱ्या एसटी बस तसेच इतर वाहनांची मोठी वर्दळ असते. आंबेत बसस्थानक हे रायगड आणि रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारे महत्त्वाचे प्रवेशद्वार मानले जाते. असे असतानाही येथे उघडी पडलेली मोरी आणि नादुरुस्त जाळे उघड्या डोळ्यांनी दिसत असूनही संबंधित यंत्रणा मात्र त्याकडे दुर्लक्षकरत असल्याची तीव्र नाराजी स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत.



मोरीचे झाकण नीट बसवलेले नसून काही ठिकाणी ते पूर्णपणे बाजूला झाले आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा गर्दीच्या वेळी चालकांचे लक्ष न गेल्यास वाहनाचे चाक मोरीत अडकण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे बसस्थानक परिसरात अक्षरशः जीवघेणा सापळा निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. याशिवाय बसस्थानकाच्या आवारातील रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डाही पडलेला आहे. त्यामुळे बस तसेच इतर वाहनांच्या ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत असून, प्रवाशांनाही मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. या गंभीर प्रकाराकडे संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन मोरीची दुरुस्ती करावी आणि बसस्थानक परिसर सुरक्षित करावा, अशी जोरदार मागणी स्थानिक रहिवासी व समाजसेवक नरेश सावंत यांनी केली आहे. अन्यथा भविष्यात एखादा अपघात घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्रशासनावरच राहील, असा इशाराही स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## पनवेलमधील ४३ ग्रामपंचायतींवर प्रशासक

### निवडणुकांकडे नागरिकांचे लक्ष

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील तब्बल ४३ ग्रामपंचायतींची मुदत संपल्याने सध्या त्या ठिकाणी प्रशासकांकडून कारभार पाहिला जात आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतींच्या निवडणुका नेमक्या कधी जाहीर होणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२६ मध्ये तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींची मुदत संपली, तर जानेवारी महिन्यात एका ग्रामपंचायतीचा कार्यकाळ पूर्ण झाला. यापूर्वीच १९ ग्रामपंचायतींवर प्रशासक कार्यरत होते. त्यामुळे सध्या एकूण ४३ ग्रामपंचायतींवर प्रशासकांमार्फत कारभार चालवला जात आहे. नियमानुसार ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपल्यानंतर निवडणूक होईपर्यंत प्रशासकांची नियुक्ती केली जाते. त्यानुसार संबंधित ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्त करण्यात आले असून, तेथील दैनंदिन प्रशासकीय कामकाज त्यांच्याकडून पाहिले जात आहे.

विशेष म्हणजे, तरघर आणि उलवे या ग्रामपंचायतींवर २०२० पासूनच प्रशासकांकडून कारभार सुरू आहे. त्यामुळे या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रतीक्षा नागरिकांना अधिक काळापासून करावी लागत आहे. सध्या प्रशासक असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये आदई, चिपळे, जांभिवली, कर्नाळा, कुंडेवहाळ, नांदगाव, पळस्पे, पारगाव, पोयंजे, शिरवली, तरघर, उलवे, वावंजे, वहाळ, वांगणी तर्फे वाजे, गव्हाण, वडघर, चावणे, कराडे खुर्द, साई, सांगुर्ली, पाले बुद्रुक, आकुर्ली, कोळखे, पाली देवद, नानोशी, हरिग्राम, बारवई, खैरवाडी, खानाव, मोरबे, खानावळे, सावळे, देवलोली, पोसरी, वाकडी, वाजे, उमरोली, केवाळे, ऊसरली, आपटा, वलप आणि वारदोली या ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

## अलिबाग येथे पत्रकार परिषद

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या ऐतिहासिक महाड सत्याग्रहाचा व मनुस्मृती दहन आंदोलनाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात १९ व २० मार्च रोजी महाड येथे होणार आहे. यानिमित्ताने १९ मार्च रोजी दुपारी महाड-रायगड मार्गावरील लाडवली येथे राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र व जाती अंत संघर्ष समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आली असून, या परिषदेची माहिती देण्यासाठी १२ मार्च रोजी दुपारी १२ वा. अलिबाग येथे पत्रकार परिषद आयोजित केली आहे.

## राज्यभरातील युवा प्रशिक्षणार्थी बेरोजगार

### मुंबईतील आझाद मैदानावर सरकारविरोधात मोर्चा

**| खारेपाट | प्रतिनिधी |**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या विविध शासकीय कार्यालयांमध्ये ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या बेरोजगार प्रशिक्षणार्थींना रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी युवा प्रशिक्षणार्थी संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी ५ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदानावर भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाले होते. प्रशिक्षणार्थींनी ज्या शासकीय कार्यालयांमध्ये प्रशिक्षण पूर्ण केले आहे, त्याच



ठिकाणी त्यांना प्राधान्याने कंत्राटी पद्धतीने रोजगार देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी सरकारकडे करण्यात आली. यावेळी संघटनेचे प्रांताध्यक्ष निलेश वसावे, राज्य सचिव ऋषीकेश पवार, कार्याध्यक्ष पवन भड, अलिबाग तालुकाध्यक्ष प्रसन्न ठाकूर, रोहा तालुकाध्यक्ष ऐश्वर्य सायगावकर, खालापूर तालुकाध्यक्ष कुणाल तांडेल, सचिव समीर साळुंखे तसेच गणेश पवार, सार्थक सावंत, आर्यन मोकळ आदींसह राज्यभरातील प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सरकारने या मागणीवर तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये धरणे आंदोलन करून आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## ईएसआयसीच्या रकमेवर भामट्याचा डल्ला

**| पनवेल | प्रतिनिधी |**

अज्ञात भामट्याने पनवेल येथील कर्मचारी राज्य विमा निगम (ईएसआयसी) च्या शाखेतील कार्यालयाचा बनावट धनादेश तयार करून त्याद्वारे ९६,९०० रुपये स्वतःच्या खात्यात वळवून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या भामट्याने ईएसआयसीच्या शाखा व्यवस्थापकाची बनावट सही करून ही फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात भामट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. संकेत शिंदे (३८) हे पनवेल येथील कर्मचारी राज्य विमा निगम कार्यालयात शाखा व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या २९ जानेवारी रोजी कार्यालयाचे कॅशिअर सत्येंद्र कुमार पंडित हे बँकेचे स्टेटमेंट तपासत असताना, त्यांना खात्यातील शिल्लक रकमेत तफावत असल्याचे दिसून आले. २८ जानेवारी रोजी एका चेकद्वारे ९६,९०० रुपये दुसऱ्या खात्यात वळवण्यात आल्याचे आढळले. धक्कादायक बाब म्हणजे, तो चेक मूळ चेकबुकमध्ये तसाच कोरा असल्याचे आढळून आले. तसेच बनावट चेकवर त्याने शाखा व्यवस्थापकांची बनावट स्वाक्षरी करून त्याद्वारे ९६,९०० रुपये उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथील ॲक्सिस बँकेच्या सुशीला नामक खातेदाराच्या खात्यात वळवण्यात आल्याचे तपासात आढळले.

**वनविभागाचा पुढाकार | कर्नाळा अभयारण्यात स्तुत्य उपक्रम**

# पक्ष्यांची तहान भागवणार कृत्रिम पाणवठे

**राजेश डांगळे**
**| पनवेल |**

वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे जंगलातील नैसर्गिक पाणीस्रोत आटू लागल्याने पक्षी व लहान वन्यप्राण्यांची तहान भागवण्यासाठी वन विभागाने पुढाकार घेत कर्नाळा पक्षी अभयारण्य परिसरात कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत. या उपक्रमामुळे उन्हाळ्यात पक्षी व वन्यजीवांना मोठा दिलासा मिळत आहे.



मुंबई-गोवा महामार्गालगत वसलेले कर्नाळा पक्षी अभयारण्य जैवविविधतेसाठी प्रसिद्ध आहे. मार्च महिन्यापासून तापमानात वाढ होऊ लागल्याने जंगलातील ओढे, झरे आणि लहान पाणीसाठे हळूहळू आटू लागतात. त्यामुळे पक्षी व वन्यप्राण्यांना पाण्याच्या शोधात भटकंती करावी लागते. ही परिस्थिती लक्षात घेऊन वन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभयारण्य परिसरातील विविध ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत.

या पाणवठ्यांमध्ये टँकरच्या सहाय्याने नियमित पाणी सोडले जात असून, त्यामुळे पक्षी तसेच लहान वन्यजीवांना सहजपणे पाणी उपलब्ध होत आहे. कर्नाळा अभयारण्यात वर्षभर विविध दुर्मिळ तसेच स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन होत असते. उन्हाळ्यात पाण्याची टंचाई भासू नये यासाठी वन विभागाकडून दरवर्षी अशी व्यवस्था केली जाते. त्यामुळे जैवविविधतेच्या संवर्धनालाही हातभार लागत असल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. वन विभागाच्या या उपक्रमामुळे कर्नाळा परिसरातील पक्षी व वन्यजीवांना उन्हाळ्यातील पाण्याची समस्या कमी होणार असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

> "उन्हाळ्यात जंगलातील नैसर्गिक पाणीस्रोत आटू लागतात. त्यामुळे पक्षी व वन्यप्राण्यांना त्रास होऊ नये म्हणून अभयारण्यात विविध ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार करून त्यामध्ये नियमित पाणी उपलब्ध करून दिले जात आहे."
>
> – वन विभागाचे अधिकारी

## शेतात घातक रासायनिक कचऱ्याची विल्हेवाट

**| पनवेल | प्रतिनिधी |**

तळोजा येथील धानसर गावच्या शिवारात उघड्या शेतात घातक रासायनिक कचरा टाकून पर्यावरण व लोकांचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या दोन व्यक्तींविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तक्रारीनंतर पोलिसांनी कारवाई केली. कारवाईत ४१ ड्रम घन रसायने, ३६ ड्रम द्रव स्वरूपातील रसायने, ३६ रिकामे ड्रम आणि सुमारे ४० ते ५० पांढऱ्या गोणींमध्ये भरलेला घनकचरा हस्तगत केला. याप्रकरणी मोहम्मद अली असगर अली खान (५०) आणि अफसर रहिस अहमद खान (३९) याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## वीस षटकांचे राजे

वीस षटकांच्या विश्वचषकामध्ये महेंद्रसिंग धोनीच्या संघाने १९ वर्षांपूर्वी जेव्हा पहिल्यांदा विजय मिळवला तेव्हा भारतीयांना तो आनंदाचा धक्का होता. मुळात त्यावेळी टी-ट्वेंटी हा प्रकार काहीसा नवीन होता. शिवाय धोनीच्या संघात सर्व खेळाडू तरुण होते. सचिन तेंडुलकर, राहुल द्रवीड, सौरव गांगुली वगैरे स्टार खेळाडूंना विश्रांती देऊन धोनी नावाच्या नवख्या तरुणावर त्यावेळी कर्णधारपदाची जबाबदारी टाकण्यात आली होती. त्याने अक्षरशः इतिहास घडवला. रविवारी सूर्यकुमार यादवच्या संघाने तिसऱ्यांदा या प्रकारातला विश्वचषक जिंकला तेव्हाही भारतीयांना पुन्हा एकवार आनंदाचा धक्का बसला. कारण, या संघाची या विश्वचषक स्पर्धेतील कामगिरी पुरेशी चांगली नव्हती. अनेकदा एकेका खेळाडूच्या पराक्रमामुळे आपण जिंकलो होतो. अगदी पहिल्याच सामन्यात अत्यंत दुबळ्या मानल्या गेलेल्या अमेरिकेसमोर आपण हरतो की काय अशी अवस्था होती. किंवा परवा उपांत्य लढतीत २५० च्या वर धावा करूनही इंग्लंड संघ आपल्याला हरवेल इतक्या जवळ आला होता. साखळी सामन्यांमध्ये दक्षिण आफ्रिकेसमोर आपले अक्षरशः पानिपत झाले होते. दुसरीकडे अंतिम स्पर्धेतला आपला प्रतिस्पर्धी न्यूझीलंड अत्यंत चांगल्या लयीत खेळत होता. उपांत्य लढतीत न्यूझीलंडने आफ्रिकेला अगदी किरकोळीत हरवले होते. त्यातच न्यूझीलंडला टी-२० विश्वचषकामध्ये आपण कधीही हरवू शकलेलो नाही असा इतिहास होता. हाच न्यूझीलंडचा संघ गेल्या वर्षी भारतात आपल्याला भारी ठरला होता. शिवाय, ५० षटकांच्या विश्वचषकात सर्व सामने चांगले खेळूनही अंतिम सामन्यात आपण ऑस्ट्रेलियासमोर लोटांगण घातले होते. त्यामुळे रविवारच्या सामन्यातही भारतासमोरचे आव्हान कडवे असेल असाच सर्वांचा होरा होता. प्रत्यक्षात हा सामना बऱ्याच अंशी एकतर्फी झाला. आपल्या फलंदाजांनी पुन्हा एकवार २५० च्या वर धावा करून अर्धा विजय निश्चित केला. नंतर बुमरा व इतर गोलंदाजांनी सुयोग्य भूमिका पार पाडल्या आणि उत्तम सांघिक खेळाचे दर्शन घडवले. १९ वर्षांपूर्वी धोनीच्या संघात सहवाग सोडला तर कोणीही स्टार नव्हता. पण त्या विजयाने तो संघच स्टार झाला. रविवारच्या विजयानेही काहीसे असेच घडणार आहे. सूर्यकुमार यादव व बुमराचा अपवाद वगळता या संघात सुपरस्टार खेळाडू नव्हते. आता या संघातले सर्वच खेळाडू स्टार होणार आहेत.

### दुबळ्या संघाची आगेकूच

भारताने १९८३ साली पहिल्यांदा एकदिवसीय सामन्यांचा विश्वचषक जिंकला. त्यानंतर जागतिक क्रिकेटचे रंगरुप बदलून गेले. वेस्ट इंडिजचे संस्थान खलास झाले. ऑस्ट्रेलियाचे बराच काळ टिकून राहिले. पण नंतर त्यालाही हादरे बसले. धोनीच्या संघाच्या विजयानंतर आयपीएलचा वार्षिक उरुस सुरु झाला. त्याने पुन्हा एकवार नवनिर्माण झाले. भारतात क्रिकेटमधल्या गुणवंतांचा अक्षरशः स्फोट झाला. स्पर्धा वाढली. त्यातून अशक्यप्राय कामगिरी करणारे नवे तारे उदयाला आले. त्याचा भारतीय संघाला चांगला फायदा झाला. मधल्या काळात आपल्याला सातत्य राखणे जमले नव्हते. पण आता २०२४ नंतर सलग दुसऱ्यांदा भारताने हा विश्वचषक जिंकला आहे. २०२४ मध्ये रोहित शर्माच्या संघाने वेस्ट इंडिजमध्ये तुफानी कामगिरी केली होती. आता घरच्या मैदानावर त्यांनी इतिहास घडवला आहे. मात्र या यशामुळे अल्पसंतुष्ट राहून चालणार नाही. कारण आता आजवर क्रिकेट न खेळणाऱ्या देशांचे संघही दरवाजावर धडका देऊ लागले आहेत. यंदा अमेरिकेच्या संघाने भारतासह अनेक बलाढ्य संघांच्या तोंडचे पाणी पळवले होते. झिंबाब्वे संघाने आता कात टाकली असून यंदा त्यांच्या झंझावातासमोर भलेभले कोलमडले. ऑस्ट्रेलियासारख्या संघाला त्यांनीच स्पर्धेबाहेर घालवले. अफगाणिस्तानचा संघाने आफ्रिकेला तगडी लढत दिली. परिणामी त्यांचा सामना दुसऱ्या सुपरओव्हरमध्ये गेला. नामिबिया, कॅनडा इत्यादी संघांच्या काही खेळाडूंची कामगिरीही जबरदस्त होती. येत्या काही वर्षात हे संघ बाद किंवा त्याहूनही पुढच्या फेऱ्यांमध्ये दिसू लागले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. यात एक गोष्ट नोंदवायला हवी. या बहुतांश संघांमध्ये मूळचे भारतीय किंवा आशियाई असलेले अनेक खेळाडू दिसतात. यापैकी काहींचे कोच हेही माजी भारतीय खेळाडू आहेत. एकूण क्रिकेटचा आपल्याकडे इतका स्फोट झाला आहे की, आपल्याकडच्या गुणवानांना इथे नाही तर परदेशातील संघांमध्ये संधी मिळू लागली आहे. एका अर्थाने क्रिकेट हा खेळ मुळातला इंग्लंडचा असला तरी त्याचा प्रसार मात्र भारत करतो आहे असे हे चित्र आहे.

### आता कसोटी क्रिकेटकडे पाहा

सध्याच्या क्रिकेटच्या काळात कोणत्याही खेळाडूला आपली कामगिरी खाली घसरू देणे परवडू शकत नाही. विशिष्ट उंचीवर स्वतःचा आलेख ठेवणे हे मोठे आव्हान असते. हे जे करू शकतात त्यांचे भाग्य उजाडते. या स्पर्धेआधी अभिषेक शर्माचा भयंकर गवगवा झाला होता. पण या स्पर्धेत शेवटचा सामना वगळता त्याचा प्रभाव पडू शकला नाही. न्यूझीलंडविरुध्द ऐन गरजेच्या वेळी त्याची बॅट चमकल्याने त्याला आणखी संधी मिळत राहू शकेल. वरुण चक्रवर्ती हाही आशियाई स्पर्धेनंतर आपल्या जादूई स्पिनसाठी नावाजला जाऊ लागला होता. पण या स्पर्धेत त्याचा हा स्पिन उघडा पडला व सर्वच संघांनी त्याची पिसे काढली. तिलक वर्मा व इतर काही खेळाडूंची कामगिरीही उंचसखल राहिली. कर्णधार सूर्यकुमार याची कामगिरीही सुमार होती. पण संघाच्या यशामुळे ती झाकून गेली. दुसऱ्या बाजूने संजू सॅमसन याच्या बाबतीत तर जणू नियतीचा काव्यात्म न्याय व्हावा असा प्रकार घडला. दोन वर्षांपूर्वी वेस्ट इंडिजमधील विश्वचषक स्पर्धेतल्या संघात असूनही त्याला एकाही सामन्यात खेळवण्यात आले नव्हते. यंदाही त्याला रिंकू सिंगच्या अनुपस्थितीमुळे संधी मिळाली. तिचे त्याने सोने केले. संजू हा अनेक वर्षांपासून आयपीएल खेळत आहे व राजस्थान संघाचा तो अनेक वर्षे कर्णधारही होता. पण त्याला आता चांगली लय सापडली आहे असे म्हणता येईल. गोलंदाजीत बुमरा हा आपला हुकुमी एक्का आहे. मात्र त्याचा फिटनेस ही मोठी समस्या आहे. त्यामुळे वीस षटकांच्या या प्रकारातच नव्हे तर एकूणच सर्व प्रकारांमध्ये भारतीय संघाला नव्या गोलंदाजांचा शोध घ्यावा लागणार आहे. अर्शदीप, दुबे हे भरवशाचे पर्याय नाहीत. त्यांचा स्वैर मारा ही चिंतेची बाब आहे. यापैकी अनेक खेळाडू अपयशी ठरूनही त्यांना पुरेशी संधी देण्याचे धोरण प्रशिक्षक गौतम गंभीरने अवलंबले. ते चांगले आहे. तरीही वरुणच्या जागी कुलदीप यादवला एकदाही संधी न देणे अनाकलनीय होते. आपल्या संघाचा क्षेत्ररक्षणाचा दर्जाही काही बाबतीत सरस तर कधी अगदी वाईट असा होता. भारतात इतक्या प्रचंड प्रमाणात आयपीएल खेळले जात असल्याने आता खेळाडूंकडून अशक्यप्राय झेलांची व चौकार वगैरे अडवण्याची अपेक्षा केली जाऊ लागली आहे. पण त्याला इलाज नाही. त्या आव्हानाला तरुण खेळाडूंना उतरवावेच लागेल. २० आणि ५० षटकांच्या सामन्यांमध्ये भारताने आता सातत्यपूर्ण अशी जागतिक दर्जाची कामगिरी केली आहे. मात्र भारताच्या कसोटी संघाचा दर्जा कमी झाला झाला आहे. गेल्या दोन वर्षात आपल्याला न्यूझीलंड व आणखीही काही देशांनी आपल्या देशात येऊन हरवले आहे. न्यूझीलंडने तर सर्वच सामन्यांमध्ये आपल्याला हरवले होते. भारतीय संघाची इंग्लंड व ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यातील कामगिरीही बरी म्हणावी इतपतच होती. त्यामुळे आता गौतम गंभीरला तिकडे लक्ष पुरवावे लागणार आहे.

विचार

# निर्यातीत भरारी, आर्थिक गुन्हेगारीत वाढ

*आर्थिक जगतातील काही बातम्यांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. देशात स्मार्टफोन निर्मितीला चालना मिळाल्यामुळे हे क्षेत्र वेगाने विस्तारत आहे. त्याचा परिणाम म्हणून स्मार्टफोन निर्यात तीस अब्ज डॉलरवर पोहोचली आहे. दुसरीकडे डिजिटल व्यवहारातील गुन्हेगारी संबंधांचा धोका वाढत असल्याची माहिती आहे. त्याच वेळी या उन्हाळ्यात विविध कारणांमुळे एसीच्या किमती वाढणार असल्याचे दिसत आहे.*




महेश देशपांडे

भारताच्या औद्योगिक प्रवासात इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राने गेल्या दशकात अभूतपूर्व झेप घेतली. केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी अलीकडेच 'एक्स' वर शेअर केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे, की भारत आता केवळ देशांतर्गत गरज भागवणारा नव्हे, तर जागतिक स्मार्टफोन उत्पादनाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनला आहे. २०२५ च्या कॅलेंडर वर्षात भारताची स्मार्टफोन निर्यात ३० अब्ज डॉलर्सच्या ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचली. ही केवळ आर्थिक नव्हे, तर धोरणात्मक यशाची नोंद आहे. ही वाढ एखाद्या आकड्यापुरती मर्यादित नाही. २०२५ मध्ये देशाची एकूण इलेक्ट्रॉनिक्स निर्यात ४७ अब्ज डॉलरपर्यंत गेली आहे. २०१४-१५ च्या तुलनेत निर्यातीत अकरापट आणि उत्पादनात सहापट वाढ झाली आहे. परिणामी, इलेक्ट्रॉनिक्स हे आज भारताचे तिसरे सर्वात मोठे निर्यात क्षेत्र ठरले आहे. या यशामागे नियोजनबद्ध धोरण, गुंतवणुकीला चालना आणि उद्योगस्नेही वातावरण यांचा मोठा वाटा आहे. मोबाइल उत्पादनाच्या बाबतीत भारताची झेप विशेष उल्लेखनीय आहे. एके काळी केवळ दोन उत्पादन युनिट्स असलेल्या देशात आज जवळपास ३०० युनिट्स कार्यरत आहेत. देशात विकले जाणारे ९९.२ टक्के मोबाइल फोन 'मेड इन इंडिया' आहेत, ही बाब स्वावलंबनाची साक्ष देणारी आहे. उत्पादन आणि निर्यात या दोन्ही आघाड्यांवर प्रचंड वाढ नोंदवली गेली आहे.

भारत सध्या जगातील दुसऱ्या क्रमांकाचा मोबाइल उत्पादक देश म्हणून उभा आहे, ही बाब जागतिक पुरवठा साखळीत देशाच्या वाढत्या प्रभावाची साक्ष आहे. या यशामागे केंद्र सरकारची 'प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह स्कीम' (पीएलआय) योजना निर्णायक ठरली आहे. मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून या योजनेने उत्पादन वाढीला चालना दिली आणि लाखो रोजगार निर्माण केले. सुमारे २५ लाख नव्या नोकऱ्या निर्माण होणे हे केवळ औद्योगिक वाढीचे द्योतक नाही, तर सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचेही सूचक आहे. महिलांचा वाढता सहभाग आणि युवकांसाठी निर्माण झालेल्या कौशल्यविकासाच्या संधी ही या प्रक्रियेची सकारात्मक बाजू आहे.

तथापि, पुढील आव्हान अधिक व्यापक आहे. आतापर्यंतचा भर मुख्यत्वे तयार उत्पादनांच्या असेंब्लीवर होता. आता सरकार मॉड्यूल्स, कॉँपोनंट्स, कच्चा माल आणि उत्पादनासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या देशांतर्गत निर्मितीकडे वळत आहे. ही धोरणात्मक दिशा भारताला केवळ 'असेंब्ली हब' न ठेवता संपूर्ण आत्मनिर्भर इलेक्ट्रॉनिक्स परिसंस्था उभारण्याच्या मार्गावर नेऊ शकते. एकंदरीत, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील ही प्रगती 'मेक इन इंडिया'च्या व्यापक उद्दिष्टांना बळ देणारी आहे; मात्र या वाढीचा वेग टिकवून ठेवण्यासाठी तंत्रज्ञानातील नवोन्मेष, जागतिक स्पर्धात्मकता आणि दर्जात्मक उत्कृष्टता यावर सातत्याने भर देणे तितकेच आवश्यक राहील. भारताची इलेक्ट्रॉनिक्स क्रांती ही केवळ आकड्यांची नव्हे, तर आत्मविश्वासाची आणि नव्या औद्योगिक युगाची सुरुवात आहे. दरम्यान, डिजिटल व्यवहारांनी जगाला वेग आणि सोय दिली असली, तरी त्याच वेगाने गुन्हेगारीचाही चेहरा बदलला आहे. जागतिक वित्तीय देखरेख संस्था 'फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्स' (एफएटीएफ)ने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालातून सायबर-आधारित फसवणूक, मनी लॉँडरिंग आणि दहशतवादी वित्तपुरवठा यांचा वाढता धोका अधोरेखित केला आहे. 'सायबर एनेबल्ड फ्रॉडः डिजिटायलेझशन अँड मनी लॉँडरिंग' या अहवालात डिजिटल गुन्हेगारी आता केवळ आर्थिक फसवणुकीपुरती मर्यादित नसून व्यापक आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी जाळ्यांशी जोडली गेल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अहवालातील आकडे चिंताजनक आहेत. ब्रिटनमध्ये नोंदवल्या जाणाऱ्या एकूण गुन्ह्यांपैकी ४० टक्क्यांहून अधिक प्रकरणे फसवणुकीशी संबंधित आहेत. सिंगापूरसारख्या तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत देशात केवळ दोन वर्षांमध्ये सायबर फसवणुकीत ६१ टक्क्यांची वाढ झाली आहे. 'एफएटीएफ'ने मूल्यांकन केलेल्या १५६ अधिकार क्षेत्रांपैकी बहुतांश देशांनी फसवणुकीला 'मनी लॉँडरिंग'चा प्रमुख धोका म्हणून मान्यता दिली आहे. यावरून डिजिटल गुन्हेगारीचा जागतिक विस्तार किती वेगाने होत आहे, हे स्पष्ट होते.

डिजिटलायझेशनचा गैरवापर ही या समस्येची मध्यवर्ती बाब आहे. सीमाहीन ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स आणि तांत्रिक प्रगतीमुळे गुन्हेगारांना अवैध निधी एका देशातून दुसऱ्या देशात वेगाने हलवणे शक्य झाले आहे. त्यामुळे अशा व्यवहारांचा मागोवा घेणे आणि पैसे परत मिळवणे अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. 'एफएटीएफ'च्या अध्यक्षा एलिसा डी अंडा मद्राझो यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे, की ज्या वेगाने गुन्हेगार आपले डावपेच बदलत आहेत, त्याच वेगाने नियामक यंत्रणांनीही कारवाई करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर 'एफएटीएफ'ने काही ठोस उपाय सुचवले आहेत. आभासी मालमत्तांवर (उदा. क्रिप्टोकरन्सी) कडक नियंत्रण, शेल कंपन्यांच्या माध्यमातून होणाऱ्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता, पेमेंट ट्रान्सपरन्सी वाढवणे आणि अवैध संपत्ती गोठवून परत मिळवण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे हे त्यातील महत्त्वाचे मुद्दे आहेत.

याशिवाय आर्थिक गुप्तचर यंत्रणा आणि बँका कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या साहाय्याने संशयास्पद व्यवहार ओळखण्यावर भर देत आहेत. पुढील काळात व्हिएन्ना येथे 'इंटरपोल' आणि 'युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्ज अँड क्राईम' (युनोडीसी) यांच्या सहकार्याने होणाऱ्या 'ग्लोबल फ्रॉड समिट'मध्ये समन्वित आंतरराष्ट्रीय कारवाई आणि फसवणुकीतील निधी पुनर्प्राप्ती या विषयावर सविस्तर चर्चा होणार आहे. डिजिटल अर्थव्यवस्था जितकी विस्तारत जाईल, तितके तिचे संरक्षण मजबूत करणेही अपरिहार्य ठरणार आहे. सायबर फसवणूक ही केवळ आर्थिक समस्या नाही, तर ती जागतिक सुरक्षेचे आव्हान बनली आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबतच जबाबदार नियमन आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य ही काळाची गरज आहे.

त्याच वेळी देशातील आघाडीची एसी उत्पादक कंपनी 'व्होल्टाज लिमिटेड'ने या वर्षी एअर कंडिशनरच्या किमतींमध्ये पाच ते १५ टक्के वाढ होऊ शकते, असे संकेत दिले आहेत. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक मुकुंदन मेनन यांच्या मते तांब्याच्या दरातील वाढ आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण ही यामागील प्रमुख कारणे आहेत. देशांतर्गत बाजारात सुमारे १८ टक्के हिस्सा असलेल्या कंपनीला २०२६ मध्ये एसी विक्रीमध्ये १५ ते २० टक्के वाढ होण्याची अपेक्षा आहे. मागील वर्ष उद्योगासाठी तुलनेने मंदीचे ठरले होते. एसी निर्मितीत तांबे, ॲल्युमिनियम आणि स्टील यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या धातूंच्या किमती वाढल्यामुळे प्रति युनिट उत्पादन खर्चात पाच ते १५ टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षी तांब्याची किंमत सुमारे ८,५०० डॉलर प्रति टन होती. ती आता १२ ते १३ हजार डॉलर प्रति टनांपर्यंत पोहोचली आहे. एसीमध्ये तांब्याचा मोठा वापर असल्याने या दरवाढीचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर होत आहे. एसीचे काही महत्त्वाचे सुटे भाग अजूनही आयात केले जातात. डॉलर मजबूत आणि रुपया कमजोर झाल्यामुळे आयात खर्च वाढला आहे. त्यामुळे कंपन्यांच्या एकूण खर्चावर अतिरिक्त दबाव निर्माण झाला आहे. या वर्षी ऊर्जा कार्यक्षमतेच्या (एनर्जी लेबल) निकषांमध्ये बदल झाले आहेत. अधिक ऊर्जा-कार्यक्षम मॉडेल तयार करण्यासाठी संशोधन आणि तांत्रिक सुधारणा कराव्या लागत आहेत. त्यातूनही उत्पादन खर्च वाढला असल्याचे कंपनीचे म्हणणे आहे. मागील वर्ष एसी उद्योगासाठी संथ गेले असले तरी यंदा १५ ते २० टक्के वाढीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वाढती मागणी बाजाराला चालना देऊ शकते. 'व्होल्टास'कडे दर वर्षी सुमारे ३० लाख स्प्लिट एसी युनिट्स तयार करण्याची क्षमता आहे. उत्तराखंड आणि तमिळनाडू येथे कंपनीचे उत्पादन प्रकल्प आहेत. सध्या या क्षेत्रात चीनचे वर्चस्व आहे, तर थायलंड दुसऱ्या क्रमांकावर आहे. एकूणच कच्च्या मालाच्या किमती, चलनवाढ आणि तांत्रिक मानकांमधील बदल यांचा एकत्रित परिणाम ग्राहकांच्या खिशावर होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. त्यामुळे एसी खरेदीचा विचार करताना किंमतींचा अंदाज घेऊनच निर्णय घ्यावा लागणार आहे.

चर्चा आजची

# पाणी टंचाईच्या झळा संपेना



प्रमोद जाधव

टँकरमुक्त जिल्हा करण्यासाठी रायगड जिल्ह्यात वेगवेगळ्या पाणी पुरवठा योजना राबविल्या आहेत. मात्र आजही जिल्ह्यात पाणी टंचाईची समस्या कायमच आहे.धरणांसह नद्यांमधील पाण्याची पातळी कमी झाली आहे. त्यामुळे पाणी कपातीचे संकट सुरु झाले आहे. पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ नागरिकांवर येऊ लागली आहे. जिल्हयात यंदा समाधानकारक पाऊस पडला असला,तरी धरणांमध्ये सध्या ५० टक्के जलसाठा शिल्लक आहे. पाणी टंचाईची समस्या भेडसावण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे टंचाईच्या झळा संपेना अशी परिस्थिती जिल्ह्यात निर्माण झाली आहे.

जिल्ह्यामध्ये लघुपाट बंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत. त्यात सुधागड तालुक्यात पाच, श्रीवर्धनमध्ये तीन, म्हसळ्यामध्ये दोन, महाडमध्ये चार, खालापूर तीन, पनवेल तीन, कर्जत दोन, उरण, मुरुड, तळा, रोहा, पेण व अलिबाग या तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक धरण आहेत. या धरणांमधून, पेण नगरपरिषद, महाड शहर, श्रीवर्धन नगर परिषदेला, महाडमधील १९ गावे, १३ गावे तसेच दुंदरेपाडा, चिंचवली, मोर्बे, आडगाव, आपटी, होराळे, जांभिवली, नंदनपाडा, नारंगी, सावरोली, शिरवली, तांबाटी, डोणवत, गोरठण, तांबाटी, खिरकंडी, ठाकुरवाडी, निगडोल, नडोदे, कलोते, वावर्ले वावंढळ, श्रीगांव, कुर्डूस, कुसूंबळे, पोयनाड, पाभरे, तोंडसुरे, संदेरी, आंबेत, फळसप, बोर्ली, मांडला, भोईघर, काकळघर, काशिद, वैतागवाडी, सोनसडे, भानंगकोंड, कलमशेत, मांदाड, वनास्ते, शेणवली, कार्ले, दिवेआगर, बोर्ली, पंचतन, भरखोल, रानवली, निगडी, गालसुरे, बापवन अशा एकूण ७८ गावांना पाणी पुरवठा होतो. लाखो नागरिकांना पाणी पुरवठा या धरणांद्वारे केला जातो. रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील संदेरी धरणामध्ये शंभर टक्के जलसाठा शिल्लक आहे. सहा धरणांमध्ये ३६ टक्केपर्यंत, १७ धरणांमध्ये ७६ टक्केपर्यंत, तीन धरणांमध्ये ८१ टक्केपर्यंत जलसाठा शिल्लक आहे. मात्र सुधागडमधील ढोकशेत धरणाने तळ गाठला असून या धरणात शुन्य टक्के जलसाठा असल्याची माहिती समोर आली आहे.

जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येणाऱ्या उमटे धरणातून अलिबाग तालुक्यातील बारा ग्रामपंचायत हद्दीतील ६५ गावांसह ३३ वाड्यांमधील ४० हजारहून अधिक नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो. वाढत्या नागरिकीकरणाबरोबरच पाण्याच्या अतिरेक वापरामुळे या धरणातील जलसाठा कमी होऊ लागला आहे. या धरणांमध्ये ५० टक्के जलसाठा शिल्लक असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

पाणी टंचाई दूर करण्यासाठी हरघर जल, जलजीवन मिशन सारख्या योजना राबविण्यात आल्या. करोडो रुपये या योजनांवर खर्च केले. मात्र आजही जिल्ह्यातील अनेक गावे, वाड्यांमधील नागरिकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.एमआयडीसीमार्फत वेगवेगळ्या गावांमध्ये पाण्याचे कनेक्शन देण्यात आले आहे. परंतु एमआयडीच्या पाण्यासाठी आठ ते पंधरा दिवस वाट पहावी लागत आहे.

जिल्ह्यात पाणी टंचाई दूर करण्यासाठी तसेच पाण्याचा हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पाणी टंचाई संभाव्य आराखडा तयार केला आहे. ऑक्टोबर २०२५ ते जून २०२६ या कालावधीसाठी नऊ कोटी ३० लाख ५० हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. जिल्ह्यातील ४६७ गावे व ७८६ वाडया असे एकूण एक हजार २५३ ठिकाणी हा निधी खर्च केला जाणार आहे. जानेवारी ते मार्च या कालावधीत चार कोटी नऊ लाख ५८ हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. त्यात ३०६ गावे व वाड्यांचा समावेश आहे. एप्रिल ते जून या कालावधीत ९४७ गावे व वाड्यांसाठी पाच कोटी, २० लाख, ९२ हजार रुपयांचा अपेक्षीत खर्च आहे. जिल्हयात ठिकठिकाणी नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. मात्र अनेक योजना होऊनही पाणी नाही, पाईप नादूस्त आहेत. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी यावर्षी पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये नळ पाणी पुरवठा योजना विशेष दुरुस्ती करण्यासाठी दोन कोटी ७४ लाख ८४ हजार रुपयांचा अपेक्षीत खर्च आहे.त्यामध्ये ८५ गावे व १५ वाड्या अशा एकूण शंभर ठिकाणी हा निधी खर्च केला जाणार आहे.

पाणी प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळे प्रयत्न केले. परंतु त्या प्रयत्नांना फारसे यश आले नसल्याचे या आकडेवारीनुसार दिसून येत आहे. टँकर मुक्त जिल्हा करण्यास प्रशासन अपयशी ठरत आहे. धरणांमधील जलसाठा हळुहळू कमी होऊ लागला आहे. काही गावांमध्ये पाणी कपात सुरु आहे. तर काही गावांमध्ये नियमीतपणे पाणी पुरवठा केला जात आहे. पाणी पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जून महिन्यात पाऊस सुरु होईपर्यंत धरणांमध्ये पाणी पुरवठा शिल्लक राहवा यासाठी नियोजन केले आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. परंतू पाणी टंचाई होऊ नये, यासाठी ठोस उपाय मात्र कधीच दिसून आले नाही. योजना फक्त कागदावर दाखवून पाणी समस्या सोडविल्याचा दिखावा करणे सोपे आहे. परंतु पाण्यासाठी वणवण करणाऱ्या नागरिकांकडे कधीतरी गांभीर्याने प्रशासनाने बघावे ही माफक अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांची आहे.

लोकसंसद

### टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे अभिनंदन!

मुंबईकर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडचा ९६ धावांनी पराभव करत २०२६ चा आयसीसी टी-२० विश्वचषक जिंकला आणि टी-२० विश्वचषकावर तिसऱ्यांदा आपले नाव कोरले. भारतीय संघ आजच्या घडीला जागतिक क्रिकेटमधील सर्वोत्तम संघांपैकी एक ठरला असून भारतीय संघाने दोनदा आयसीसी एकदिवसीय विश्वचषक (१९८३ आणि २०११),




तीनदा आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी (२००२, २०१३ आणि २०२५) आणि तीनदा आयसीसी टी-२० विश्वचषक (२००७, २०२४ आणि २०२६) असे एकूण आठ आयसीसी विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम केला आहे. विशेष म्हणजे २०१९-२१ आणि २०२१-२३ मध्ये जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारतीय संघाने प्रवेश केला होता. पण भारताला दोन्ही वेळेस उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. आता अहमदाबाद येथे टी-२० विश्वचषक २०२६ जिंकणाऱ्या भारतीय संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद राखणारा संघ, यजमान देश म्हणून घरच्या मैदानावर विश्वचषक जिंकणारा एकमेव संघ आणि सर्वाधिक तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा संघ असे अनेक विक्रमही प्रस्थापित केले. टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे अभिनंदन!

**- प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# देशातील पहिल्या महिला स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले

सावित्रीबाई फुले यांनी त्यांचे पती महात्मा ज्योतिराव फुले यांच्यासोबत भारतातील महिलांचे अधिकार सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाई आणि त्यांचे पती हे भारतातील स्त्री शिक्षणाचे प्रणेते आहेत. सावित्रीबाईंना भारतीय स्त्रीवादाची जननी मानले जाते. या दोघांनी १ जानेवारी, १८४८ रोजी पुणे येथील भिडेवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. ही शाळा देशात स्थापन झालेल्या सुरुवातीच्या शाळांपैकी एक होती.

१ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात जोतीराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. साऱ्या कर्मठ मनुवादी समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि चालवल्या. तत्कालीन ब्रिटिश भारतातली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली.

यापूर्वी मिशनऱ्यांनी आणि अन्य लोकांनी काढलेल्या १४-१५ शाळा उत्तर भारतात होत्या. या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागांतही २-३ मुलींच्या शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालवल्या. मुंबईतल्या गिरगावातही त्याच सुमारास स्टूडन्ट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीने 'कमळाबाई हायस्कूल' नावाची मुलींसाठीची शाळा सुरू केली.

सावित्रीबाईंच्या शाळेत सुरुवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी 'धर्म बुडाला.... जग बुडणार.... कली आला....' असे सांगून केले. कर्मठ सनातन्यांनी विरोध केला, अंगावर शेणही फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. पण अनेक संघर्ष करत हा सावित्रीबाईंचा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. त्यासाठी त्यांना घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. जोतिरावांनी बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालवले. फसलेल्या वा बलात्काराने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. या बालहत्या प्रतिबंधक गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले. केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. फुले यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. त्या एक लेखिका देखील होत्या. त्यांनी मराठी भाषेत विपुल लेखन केले आहे. १८९७ मध्ये प्लेगची साथ आल्यावर त्यांनी लागण झालेल्या लोकांसाठी काम केले. या प्रक्रियेत सावित्रीबाई फुले यांना देखील प्लेगची लागण झाली. १० मार्च, १८९७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

# वणव्यांमुळे पर्यावरणाची हानी

## ● वन्यजीवसृष्टी धोक्यात; वनविभागाकडून जागृत होणे गरजेचे, स्थानिकांची मागणी

| मुंबई | प्रतिनिधी |

**सध्या डोंगर दऱ्यांमध्ये वणवे लागल्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. आज्ञातांकडून खोडसाळपणे वणवे लावण्याचे प्रकारही दिवसेंदिवस वाढत आहेत. याला चाप बसण्यासाठी शासनस्तरावर कायद्याची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. अशी मागणी पर्यावरणप्रेमींकडून केली जात आहे. यातूनच पर्यावरणाचा समतोल योग्य प्रकारे राखण्यास मदत होईल. त्यामुळे आपली जैवविविधता जपण्यासही मदत होईल.**



फेब्रुवारी ते मे अखेर या महिन्यात वणवे लावण्याचे प्रकार सतत घडत असतात. यात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. यातच उष्ण लहरींचे वाढलेले प्रमाण आणि शित लहरींचे कमी होत असलेले प्रमाण हा निसर्गातील असमतोल जंगलातील वणव्यांना निमित्त ठरत असून उन्हाळ्यात वणवा लागण्याच्या प्रकारात वाढ होताना पहावयास मिळत आहे.

वणवे टाळण्यासाठी शासनस्तरावर जनजागृती बरोबरच ठोस उपाययोजनांची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे जंगलात निर्माण झालेले शुष्क वातावरण हे आगीच्या तीव्रतेला हातभार लावण्यास कारणीभूत ठरत आहे. त्याचबरोबर विविध ठिकाणी विकृत मानसिकतेपोटी लावले जाणारे वणवे ही पर्यावरणा समोरील खूप मोठी समस्या बनली आहे. रोज कुठे ना कुठे वणवा लागल्याच्या घटना घडताना दिसत आहेत.

वणव्यामुळे अनेक पक्षी त्यांची घरटी, सरपटणारे प्राणी, सूक्ष्म जीव यांची मोठ्या प्रमाणात होणारी जीवितहानी फळझाडे, बहुगुणी वनौषधी जळून खाक होते ही मोठी चिंतेची बाब आहे. याशिवाय जंगलातील नैसर्गिक व अनैसर्गिक वणव्याला निसर्गातील असमतोल यासाठी मानव अप्रत्यक्षपणे जबाबदार आहे. ज्या परिसरामध्ये वणवा लागतो तेथील जमीन जैवविविधतेच्या दृष्टीने पुनर्स्थापित होण्यासाठी बराच कालावधी जावा लागतो. त्यामुळे जंगले विरळ होत चालली आहेत.

शिवाय मानवनिर्मित वणवे बेकायदेशीर व अनैतिक सुद्धा आहेत याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, या नैसर्गिक व अनैसर्गिक वणव्याच्या दाहकतेतून जंगलांना, निसर्गाला, पर्यावरणाला वाचवायचे असेल तर सरकारने वणवामुक्त गाव योजना, प्रत्येक गावामध्ये ग्रामसभा घेऊन वृक्षवली अभियान, वृक्षसंवर्धन मार्गदर्शन, स्थानिक युवकांना वणवा विझवण्याचे प्रशिक्षण देऊन वणवा विरोधी सशस्त्र पथक आदी पर्यायाबरोबरच निसर्गप्रेमी, वन्यजीवप्रेमी, पर्यावरणप्रेमी यांनी पुढे येऊन लोकांमध्ये जनजागृती करणे गरजेचे आहे.

> **जंगलातील आग एकाच वेळी वातावरणात कार्बन डाय ऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड आणि सूक्ष्म कण पदार्थ मोठ्या प्रमाणात सोडून हवामानावर परिणाम करते. परिणामी वायू प्रदूषणामुळे श्वसन आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्यांसह अनेक आरोग्य समस्या उद्भवू शकतात. मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. श्वास रोखल्यामुळे अनेकांचा मृत्यूही संभवतो.**
>
> **– शेखर कांदळेकर, पर्यावरणप्रेमी**

कोकणातील निसर्ग संपन्नतेचा अमोल ठेवा जतन करावा, यासाठी वनविभागाने एक पाऊल पुढे टाकावे, अशी मागणी जनमानसातून केली जात आहे.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० मार्च

१) श्री. लक्ष्मण बाळू पाटील
मु.कुरूळ, अलिबाग, १०-३-१९४२
२) श्री. शंकर कृष्ण ठाकूर
मु.चाळमळा अलिबाग, १०-३-१९४८
३)श्री.प्रविणचंद्र जगजीवन देवालिया
प्रधानवाडी, अलिबाग
दि.१०-३-१९५१
४)श्रीम.नाजुदेवी मगराज मंडोवर
अलिबाग दि.१०-३-१९४७

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**



**स्व. मुरजी रनशी काराणी, स्मरणार्थ अलिबाग**

---

## हेटवणे येथे शिवजयंती साजरी

**कोलाड** : हेटवणे गावामध्ये जय बजरंग क्रीडा मंडळ हेटवणे यांच्यावतीने तिथीप्रमाणे शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी कोलाड पोलीस अधिकारी भारत फारणेंच्या हस्ते छ. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पमालिका अर्पण केली. तर पोलीस महाडिक नरेश पाटील, सर्व पोलीस स्टाफ, मांडलाचे अध्यक्ष अनिल निकम, अमीर तेलंगे, तसेच सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. रोहा अष्टमी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा वनश्री समीर शेडगे याच्या हस्ते लहान मुलांना शालेय वस्तू वाटप करण्यात आले.

## महिला दिन उत्साहात साजरा

| तळा | प्रतिनिधी |

श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे रविवारी (दि.८) आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच रायगड भूषण पत्रकार पुरुषोत्तम मुळे उपस्थित होते.




यावेळी पुरुषोत्तम मुळे यांनी महिलांचे समाजातील, शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रातील मोलाचे योगदान अधोरेखित केले. आजच्या आधुनिक युगात महिलांचे समाजाच्या प्रगतीमध्ये योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिन का साजरा केला जातो, याचे महत्त्व स्पष्ट करत महिलांचे समाजातील स्थान अधोरेखित केले. शिक्षण, नोकरी, विज्ञान, क्रीडा तसेच अंतराळ संशोधन अशा विविध क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय कामगिरी करून स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

## ज्येष्ठ नागरिक महिलांचा सन्मान

**चौक** : जागतिक महिला दिनाचे औचित साधून ज्येष्ठ नागरिक संघटना चौक येथे रविवारी (दि.८) महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून चौक येथील आदर्श पुरस्कारीत असलेली दगडी शाळेतील शिक्षिका आरती नाईक (अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्ते) तसेच मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल डॉक्टर स्वरांजली गायकवाड उपस्थित होत्या. अंधश्रद्धा निर्मूलनावर मार्गदर्शन करून जेष्ठ नागरिक महिलांना डॉ. गायकवाड यांनी पुढील आयुष्य कसे जगावे, याबद्दल मार्गदर्शन केले. यानंतर ८० वर्षांपुढील जेष्ठ नागरिक महिलांचा सन्मान करण्यात आला.

## स्मिता काळेंना समाजभूषण पुरस्कार

**अलिबाग :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शिंदे शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यात रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या स्मिता काळे यांना सत्यशोधक मुक्ता साळवे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील इतिहास संशोधन केंद्रात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी शिंदे प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष विनोद शिंदे, सरचिटणीस सुमन शिंदे, राज्याच्या समाज कल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ मुंडे आदी उपस्थित होते. स्मिता काळे या गेली ४० वर्षे रायगड जिल्हयात सामाजिक कार्यात अग्रेसर असून तळागाळातील लोकांमध्ये काम करीत आहेत. विशेषतः आदिवासी समाज, बालकामगार दुर्लक्षित बालके महिला तसेच विधी संघर्षग्रस्त बालके, एकल पालकत्व बालके अशा अनेक समाजातील घटकांसोबत काम करत त्यांनी नावलौकिक मिळवला आहे.

## शिवजयंती उत्सवानिमित्त व्याख्यान




**नवी मुंबई :** सानपाडा येथे शिवजयंती उत्सवानिमित्त सुप्रसिद्ध लोकव्याख्यानकार प्रा. विशाल गरड यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम सानपाडा सामाजिक संस्थेचे प्रमुख सल्लागार मिलिंद सूर्यराव आणि शिवाई महिला मंडळाच्या अध्यक्षा शुभांगी मिलिंद सूर्यराव यांच्या माध्यमातून शनिवारी (दि.७) संत गाडगे महाराज खेळाचे मैदान, सेक्टर – ८ येथे पार पडला. आतापर्यंत युट्यूब आणि इन्स्टाग्रामवर प्रा. विशाल गरड यांचे अनेक व्याख्यान ऐकले होते. मात्र प्रत्यक्षात सानपाडा येथे प्रथमच प्रा. विशाल गरड यांचे शिवचरित्रावर आधारीत व्याख्यान झाले. तब्बल दीड ते पावणे दोन तास चाललेल्या या व्याख्यानाने छत्रपती शिवाजी महाराजांचा रोमांचकारी इतिहास डोळ्यांसमोर उभा केला. प्रा. गरड यांनी शिवचरित्रातील अनेक प्रसंग आणि घटना सांगून त्यातून आजच्या पिढीने काय बोध घेतला पाहिजे, हे स्पष्ट केले. छत्रपती शिवरायांची युद्धनीती व कूटनीती, वास्तुकला, शिल्पकला, महिलांचा सन्मान, शेतकऱ्यांविषयी व रयतेविषयी असणारी आस्था, संघटन कौशल्य, जलव्यवस्थापन, पर्यावरण रक्षण यासारखे विविध तत्त्वे संपूर्ण जगाला मार्गदर्शक आहेत. छत्रपती शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यांनी विशद केले. या कार्यक्रमाचा परिसरातील अनेक शिवभक्तांनी लाभ घेतला.

## नरेंद्र भुंडे सेवानिवृत्त



**चिरनेर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे वाहतूक शाखा विभाग मुंबईचे सहाय्यक वाहतूक निरीक्षक नरेंद्र चाया भुंडे हे ३७ वर्ष सेवा बजावत नियत वयोमानानुसार नुकतेच सेवानिवृत्त झाले. मुंबई वाहतूक शाखा विभागाच्या वतीने मुंबई विभागीय वाहतूक अधिकारी अमित गिरमे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सपत्नीक त्यांना सन्मानित करण्यात आले. ४ ऑक्टोबर १९८९ साली ते वाहतूक नियंत्रकपदी रुजू झाले. तर सहाय्यक वाहतूक निरीक्षक म्हणून ते वाहतूक विभाग मुंबई येथून, सेवेतून निवृत्त झाले आहेत. याप्रसंगी भुंडे यांच्या सहचारणी ज्योती भुंडे, जतीन भुंडे, वेदिका सखे, करिष्मा भुंडे यांचाही सन्मान करण्यात आला.

---

### पान १ वरून

## शेतजमिनीत विषारी रसायनांचा डंप

उपप्रादेशिक कार्यालयाचे क्षेत्र अधिकारी शिवानंद बसवडे यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे. ६ मार्च रोजी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास धानसर गावाबाहेरील मोकळ्या शेतजमिनीत तपासणी करण्यात आली असता हा प्रकार उघड झाला. तपासादरम्यान संबंधित शेतजमिनीत खड्डे करून त्यामध्ये घातक रसायने ओतण्यात आल्याचे आढळून आले. या रसायनांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे आवश्यक असतानाही नियमांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी तळोजा पोलिसांनी मुंबईच्या साकीनाका परिसरात राहणारे मोहम्मद अली असगर अली खान (५०) तसेच मुंब्रा येथील कौसा परिसरात राहणारे अफसर रहिस अहमद खान यांच्याविरोधात गुन्हा नोंदविला आहे.

## आमदारांचा निधी तिजोरीत

प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ४० विकासकामासाठी फक्त दोन कोटी २७ लाख रुपयांचा निधी आमदार दळवी यांनी खर्च केला आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघातील आमदार महेंद्र थोरवे यांनी मान्यता मिळालेल्या ४६ कामांसाठी दोन कोटी ३१ लाख रुपयांचा निधी खर्च केल्याची माहिती उघड झाली आहे. इतर लोकप्रतिनिधींच्या तुलनेने आमदार दळवी आणि आमदार महेंद्र थोरवे निधी खर्च करण्यास पिछाडीवर असल्याचे समोर आले आहे.

शिंदे गटातील दोन्ही आमदारांनी त्यांच्या मतदार संघात करोडो रुपयांचा निधी आणल्याची जाहीरातबाजी मोठ्या प्रमाणात केली. प्रत्यक्षात मात्र प्राप्त झालेल्या निधीमधील खर्चदेखील शंभर टक्के करण्यास दोन्ही आमदार अपयशी ठरल्याचे आकेडवारीनुसार दिसून आले आहे. आर्थिक वर्ष संपण्यासाठी वीस दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे उर्वरित निधी खर्च करण्यास लोकप्रतिनिधी यशस्वी ठरतील का, असा प्रश्न जनमानसातून उमटला जात आहे. निधी पडून राहिल्याने मतदार संघात पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित राहण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

## आरटीई प्रवेशाच्या निर्णयाला स्थगिती

कार्यकर्ते आशिष फुलझेले, अनिकेत कुत्तरमारे यांनीही केली होती. या दोन्ही याचिकांवर सोमवारी (दि.९) सुनावणी करत कोर्टाने सरकारच्या आरटीई प्रवेशाच्या १ किमी अटीला स्थगिती दिली. १ किलोमीटरची अट आरटीई कायद्यात कुठेही नाही. शिक्षण हक्क कायदा हा केंद्र सरकारचा आहे. त्यात राज्य सरकार सुधारणा करून १ किलोमीटरची अट लादणे म्हणजे एका हाताने अधिकार देऊन दुसऱ्या हाताने काढून घेण्यासारखं आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

दरम्यान, शिक्षण हक्क कायदा हा सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांतील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देतो. १ किमीची अट मनमानी, अवैध आणि संविधानविरोधी असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता पालकांना आपल्या मुलांसाठी कोणतीही शाळा निवडता येणार आहे. त्यामुळे न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

## खांडस-अंबेरपाडा येथे जमिनीचे कुंपण तोडले

व काटेरी तारांचे कुंपण घातले होते. मात्र, ३ मार्च रोजी रात्री साडेनऊ वाजता ते ४ मार्च रोजी सकाळी साडेआठ वाजताच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने या कुंपणाचे सुमारे २० पोल तोडून नुकसान केले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच दिलीप पद्माकर जगताप (५९) यांनी कळंब पोलीस चौकीला घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. ही घटना कळंब पोलीस क्षेत्राच्या हद्दीतील असल्याने, नेरळ पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तिविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन कळंब पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसावी यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## हजारो कंटेनर जेएनपीए बंदरातच

होते. मात्र, युद्धामुळे आखाती देशांत निर्यात केल्या जाणाऱ्या केळी, द्राक्षे, भाज्या, मासळी आणि चिकन-मटण यासारख्या नाशवंत मालाचे सुमारे १ हजार २००हून अधिक कंटेनर बंदरात अडकून पडले आहेत. त्यातील एका कंटेनरमध्ये सुमारे २२ टन माल असतो. रमजानच्या महिन्यात भारतातील केळी आणि द्राक्षांना आखाती देशांत मोठी मागणी असते. हजारों कंटेनर बंदरातच अडकला आहे. सांगली येथून निघालेला माल बंदरात अडकल्याची माहिती निया कंटेनर यांनी दिली.

## उपजिल्हा रुग्णालयात गरोदर महिलांची फरफट

रुग्णालयात प्रसूतीतज्ज्ञ नसल्यामुळे गुंतागुंतीच्या प्रसूती करणे शक्य नसल्याचेही सांगितले जात आहे. गंभीर बाब म्हणजे, २०२३ पासून प्रतिनियुक्तीवर गेलेल्या डॉ. तरपेवाड यांची आजपर्यंत प्रतिनियुक्ती रद्द करण्यात आलेली नाही. त्यामुळे कर्जत तालुक्यातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गरोदर महिलांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, कर्जत उपजिल्हा रुग्णालयात तातडीने कायमस्वरूपी प्रसूतीतज्ज्ञ डॉक्टर नेमण्यात यावेत, अशी जोरदार मागणी होत आहे. महाड येथे सेवा बजावणारे आणि कर्जत उपजिल्हा रुग्णालयाच्या आस्थापनेवर असलेले डॉक्टर तात्काळ कर्जत येथे रुजू करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड. कैलास मोरे यांनी केली आहे. त्यांनी इशारा दिला की, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास गरोदर महिलांच्या आरोग्याशी होणाऱ्या या अन्यायाविरोधात तीव्र आंदोलन उभारले जाईल.

## महाडमध्ये साहित्याचा जागर

त्यानंतर डॉ. विष्णू सुरासे यांचा तणावमुक्त आनंदी जीवनाचा मूलमंत्र हा विनोदी साहित्य वाचनाचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि.१३) सकाळी ९.०० वाजता जि.प. शाळा आसणपोईच्या विद्यार्थ्यांचे पथनाट्य होईल. त्यानंतर वाचन संस्कृतीचे पाईक-सार्वजनिक ग्रंथालये या विषयावर चांगदेव काळे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद रंगेल, ज्यामध्ये शैलाताई पाटील, रामदास गायकवाड, प्रा. भाऊसाहेब नन्नावरे आणि सीमा मपारा सहभागी होतील. दुपारी प्रा. यशवंत गोसावी हे कुशल प्रशासक-लोकमाता अहिल्याबाई होळकर या विषयावर व्याख्यान देतील. दुपारी चारुदत्त चिखले रचित ही माती माझ्या यात्रेची विठाई या कवितासंग्रहाचे प्रकाशन होईल. त्यानंतर प्रा. एल.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काव्यवाचन सोहळा संपन्न होईल. काव्यवाचन सत्रात रमेश धनावडे, नंदू तळकर, जितेंद्र ओक, हेमंत बारटक्के, डॉ. सुभाष कटकदौंड, शरद कोरडे, पा.शि. पाटील, प्रतीक्षा नगरकर, प्रिया शहा, कैलास पिंगळे, दीप्ती कुलकर्णी, वैभव घनावडे आणि शीतल गांधी हे कवी सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर या दोन दिवसांत ग्रंथांचे भव्य प्रदर्शन व विक्री कार्यक्रमस्थळी होणार असून, येथे सर्वांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. या कार्यक्रमाचे नियोजन सहायक ग्रंथालय संचालक प्रशांत पाटील आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी केले असून, या ग्रंथोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन रायगड ग्रंथोत्सव समितीने केले आहे.

---

## निवडक

### नळेफोडी गावाला पुरस्कार



**म्हसळा :** रायगड किल्ल्यापासून सुमारे ४५ किलोमीटर अंतरावर असलेले नळेफोडी गाव आपल्या एकजुटीमुळे आणि विकासकामांमुळे विशेष ओळख निर्माण करत आहे. गावातील श्री विघ्नहर्ता मंदिर हे जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असून भक्तांच्या मनोकामना पूर्ण करणारे मंदिर म्हणून त्याची ख्याती आहे. ग्रामस्थांमधील दृढ एकता हे या गावाचे वैशिष्ठ्य आहे. कोणत्याही राजकीय मतभेदांना दूर ठेवत सर्व ग्रामस्थ एकत्रितपणे गावाच्या प्रगतीसाठी कार्य करत आहेत. सर्वानुमते निर्णय घेऊन गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक उपक्रम राबविण्यात आले आहेत. बसथांब्यापासून शाळेपर्यंत रस्त्यालगत प्रकाश व्यवस्था, सौरऊर्जा प्रकल्प, गावाच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे, ऑनलाईन सुविधांसाठी मोफत वाय-फाय, तसेच पाण्यासाठी विहीर आणि धरण बांधकाम अशी अनेक कामे यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली आहेत. गाव आधुनिकतेकडे वाटचाल करत असताना ग्रामस्थांनी स्वकष्टाने अनेक उपक्रम राबवून विकासाचा आदर्श निर्माण केला आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत स्वदेश फाउंडेशनच्या वतीने नळेफोडी गावाला 'स्वप्नातील गाव' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या सन्मानामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून भविष्यातही गावाच्या प्रगतीसाठी अशाच उपक्रमांना गती देण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

### महिलांना सॅनिटरी नॅपकिनचे वाटप



**रेवदंडा** : जागतिक महिला दिनानिमित्त उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्था व माणुसकी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत इको-फ्रेंडली व बॉडी-फ्रेंडली सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे महिलांना आरोग्य व स्वच्छतेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन देण्यात आले. या कार्यक्रमाला उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या कार्यक्रम व्यवस्थापक ममता म्हात्रे तसेच नेहा गायकवाड उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मासिक पाळीदरम्यान स्वच्छतेचे महत्त्व, योग्य सॅनिटरी नॅपकिनचा वापर आणि आरोग्याची काळजी कशी घ्यावी, याबाबत माहिती दिली. या उपक्रमामुळे महिलांमध्ये स्वच्छता व आरोग्याबाबत सकारात्मक संदेश पोहोचला. हा उपक्रम उज्ज्वल भविष्य सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा उज्ज्वला भालचंद्र चंदनशिव, संस्थेचे सचिव व माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान, तसेच संस्थेचे खजिनदार डॉ. नितीन गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. त्यांच्या प्रेरणेमुळे जागतिक महिला दिन समाजोपयोगी व अर्थपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला.

---


### नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक दिगंबर शंकर मोरे, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १२१९/३ | ०-७०-८० पो.ख ०-०४-०० एकुण ०-७४-८० | २६.२१ |

वर नमुद जमिन मिळकतींपैकी खाते क्र.४७४४ सामाईकात असलेले क्षेत्र ०-०६-०० हे.आर., आकार २.२२ रु. पैसे, या मिळकतीमधील श्री.दिगंबर शंकर मोरे यांचा असलेल्या अविभक्त हिश्याबाबतचे.

दिनांक: १०/०३/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी १) श्री.प्रविण बाळकृष्ण मुंढे, २) श्री. पुरुषोतम बाळकृष्ण मुंढे यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे डोंगरपाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| १) किशोर शिवनाथ हडप २) दिनेश पंढरीनाथ हांडे | १० | १०/१०/क | ०-६०-०० | ०-४८ |
| | या पैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ० आर ४० पॉ ०० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १०/०३/२०२६



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशील मे. दि. एस. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रोप्रा. श्री. सागर रत्नाकर टापरे यांनी मौजे पेण ग्रामीण, ता. पेण, जिल्हा रायगड या हद्दीतील, श्री.भालचंद्र कचेर पाटील यांच्या नावे असलेली खालील वर्णनाची बिन शेती जमिन मिळकत विकसीत कराराने विकसीत करण्याकरिता घेण्याचे ठरविले आहे.

सबब सदरच्या मिळकतीचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे किंवा कसे? सदरची मिळकत विकसीत करण्यास योग्य आहे किंवा कसे? हे ठरवून मिळण्याकरिता सदरची जाहीर नोटीस आज रोजी प्रसिद्ध करित आहेत.

मिळकतीचे वर्णन :
मौजे पेण ग्रामीण, ता.पेण, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत

| अ. क्र. | जमीन मालकाचे नांव | गट नं./ सर्व्हे नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार |
|---|---|---|---|---|
| ०१ | भालचंद्र कचेर पाटील | १०९/५/अ/८ | २.५१.०० | १६०.६४ |

वरील जमीन मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर, वारस, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, अन्नवस्त्र, न्यायालयाची जप्ती, वहिवाट, भाडेपट्टा, विकसीत करार, वहिवाट ताबे कब्जा व साठेकरार अगर कुठल्याही प्रकारचे इतर हक्क व हितसंबंध किंवा वाद विवाद असल्यास त्याची आमचे अशिलांच्या खरेदी (विकसीत करार) व्यवहारांस कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व सदरील बिनशेती जमिन मिळकत मे. दि. एस. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रोप्रा. श्री.सागर रत्नाकर टापरे यांच्या मार्फत विकसीत करण्यास येईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक :०६/०३/२०२६

**ॲड. विधिती जयेश म्हात्रे.**
दुर्वांकूर, चिंचपाडा, ता.पेण,
जिल्हा रायगड.
मोबाईल : ८७९३७५५१०५

## निवडक



### वऱ्हाड-जांभुळपाडा येथे प्रश्नमंजुषा

**सुधागड-पाली :** वऱ्हाड-जांभुळपाडा ग्रामपंचायतीत जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी महिलांसाठी विशेष कार्यक्रम, दुपारी स्पर्धा आणि संध्याकाळी सेलिब्रिटींची उपस्थिती अशा दुहेरी उत्सवाने ग्रामपंचायतीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सकाळी झालेल्या कार्यक्रमात महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. कर्तृत्ववान महिलांचा सत्कार, महिला सक्षमीकरण व हक्कांबाबत जागरूकता निर्माण करणारे उपक्रम राबविण्यात आले. ग्रामपंचायत हद्दीतील महिला बचत गट व ग्राम संघ यांच्यासाठी विष्णू मंदिर देवस्थान सभागृहात विशेष बैठक व्यवस्था करण्यात आली. महिला दिनानिमित्त फनिगेम्स, प्रश्नमंजुषा आणि डान्स अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. महिलांनी उत्साहाने सहभाग घेतल्याने वातावरण आनंदमय झाले. महिला दिनाच्या औचित्याने मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियान कार्यक्रमांतर्गत पृथ्वीक प्रताप आणि शिवाली परब ग्रामपंचायतीत दाखल झाले. या कार्यक्रमासाठी राजिप अलिबागचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपूरे, सुधागड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी लता मोहिते, सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश घरत, विस्तार अधिकारी सुनील अहिरे, पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी,तसेच सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य व कर्मचारी, ग्रामपंचायत अधिकारी श्री.सचिन बालाजी केंद्रे उपस्थित होते.



### धुतुममध्ये महिलांना उद्योगाचा हात

**उरण :** महिला सक्षमीकरणाचा गजर फक्त भाषणात नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देत धुतुम ग्रामपंचायतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत गावातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी व्यवसाय उपयोगी साहित्याचे मोफत वाटप केले. या उपक्रमामुळे गावातील महिलांना स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी मोठी चालना मिळाली आहे. धुतुम ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात १८ महिला बचत गटांना रोजगार उभारण्यासाठी विविध यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले. यामध्ये खोबरे वाटण्याची मशीन, कापूर मशीन, पापड व भाकरी प्रेस मशीन, सेमी पत्रावळी मशीन, कुरडई-चकली मशीन, अगरबत्ती मशीन तसेच चटई तयार करण्याचे साहित्य अशा एकूण सुमारे २० लाख रुपयांच्या व्यवसाय साहित्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास सुचिता ठाकूर, स्मिता ठाकूर, रविनाथ ठाकूर, प्रकाश ठाकूर, प्रेमनाथ ठाकूर, चंद्रकांत ठाकूर, कविता पाटील, सुचिता कडू, अनिता ठाकूर, करिष्मा ठाकूर, नागनाथ घाडगे आणि ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.



### पोलीस स्टेशनचा कारभार महिलांच्या हाती

**वावोशी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत खोपोली पोलीस स्टेशनच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. नगरपरिषदेच्या नगरसेविका, डॉक्टर्स, परिचारिका, सामाजिक कार्यकर्त्या, महिला पोलीस कर्मचारी, महिला सफाई कामगार, महिला खेळाडू तसेच आदिवासी महिला भाजीविक्रेत्या अशा विविध स्तरातील महिलांचा यावेळी पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. महिला दिनानिमित्त खोपोली पोलीस स्टेशनचा प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण यांच्याकडे प्रतीकात्मक चार्ज सोपविण्यात आला. यावेळी पोलीस स्टेशनमधील सर्व महत्त्वाच्या जबाबदाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी समर्थपणे सांभाळल्या. प्रभारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर पोलीस उपनिरीक्षक पूजा चव्हाण यांनी आपल्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडत दिलेल्या सन्मानाबद्दल त्यांनी मनापासून कृतज्ञता व्यक्त केली.


### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **जाहिरात : 'विहीर' आपल्या शेती, वाडी, बंगला सोसायटीत पाण्याच्या** सोयीसाठी RCC रिंगाची विहीर बनवून घेण्यासाठी संपर्क करा. रणजित पाटील. फोन : ९८३४३०३९४१, ९८८१६३७०४७ अलिबाग
- **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **ब्लॉक विकणे आहे.** चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील ६६० स्क्वे फूट संपर्क : ९०२८५६५९१७, ९८२२०३१०१७
- **बांधकाम साहित्य विक्री दुकानात अकाऊंटस** टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. किमान २/३ वर्षाचा अनुभव संपर्क- ८८०६६८३२३२, ८००७८९३२३२
- **वॉन्टेड अलिबागेतील वृद्ध अपंग जोडप्यास** रात्री साडेदहा ते पहाटे साडेचारपर्यंत पेशंटला मदतनीस म्हणून सावध झोप असणारी महिला वृद्ध मदतनीस पगार रोजच्या रोज आठशे रूपये. ८५३०३०९७६५
- **अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट** विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# जिल्ह्यात महिला दिन उत्साहात

**आजची महिला केवळ चूल आणि मूल इथपर्यंत मर्यादित राहिलेली नाही. शिक्षण, विज्ञान, संरक्षण, क्रीडा आणि राजकारण या प्रत्येक क्षेत्रात महिलांनी आपला ठसा उमटवला आहे. आज भारताच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या महिला सैनिकांपासून ते इस्रोच्या मोहिमांचे नेतृत्व करणाऱ्या महिला शास्त्रज्ञांपर्यंत, प्रत्येकीने हे सिद्ध केले आहे की, त्यांच्यासाठी आकाशही ठेंगणे आहे. याच धरतीवर जिल्ह्यात ठिक-ठिकाणी रविवारी (दि.८) महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.**

## चौल-रेवदंड्यात महिला दिन महोत्सवाचा जल्लोष

### कर्तृत्ववान महिलांचा गौरव; मराठमोळ्या फॅशन शोने वेधले लक्ष

**| अलिबाग | ओमकार नागावकर |**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून चौल-रेवदंडा परिसरातील महिलांसाठी आयोजित महिला दिन महोत्सव २०२६ - पर्व २ हा भव्य आणि दिमाखदार सोहळा रविवारी (८ मार्च) सायंकाळी ६.३० वाजता रेवदंडा येथील एस.आर.टी. हायस्कूल मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. महिला सन्मान, आत्मविश्वास, कला आणि संस्कृतीचा संगम घडवणारा हा कार्यक्रम परिसरातील नागरिकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.




यावेळी समाजात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सरोज वरसोलकर, रिया झावरे, रेखा घरत, नूरजहा हुसेन बुऱ्हान, अश्विनी राऊत, हर्षदा धुमाळ या कर्तृत्ववान महिलांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याचा गौरव करताना उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या कर्तृत्वाची दखल घेत त्यांचे कौतुक केले. या सन्मानामुळे उपस्थित महिलांमध्ये नव्या आत्मविश्वासाची आणि प्रेरणेची भावना निर्माण झाली.

कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे रायगड जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, सोनाली मोरे, माजी सरपंच रूपाली म्हात्रे तसेच नागाव ग्रामपंचायत सरपंच हर्षदा मयेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरला तो रायगड जिल्ह्यातील ११ प्रसिद्ध मॉडेल्सचा मराठमोळा फॅशन शो. पारंपरिक मराठी वेशभूषा, दागिने आणि संस्कृतीची सुंदर झलक या फॅशन शोमधून पाहायला मिळाली. चौल-रेवदंडा परिसरात प्रथमच असा आगळावेगळा फॅशन शो सादर झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि उत्साह दिसून आला. या फॅशन शोचे दिग्दर्शन आंतरराष्ट्रीय कोरिओग्राफर जयेश पाटील यांनी केले. मॉडेल्सचा आकर्षक हेअर व मेकअप 'युगाज सलोन', रेवदंडा पारनाका यांनी केला, तर कलाधरा ज्वेलरीतर्फे दागिन्यांची सजावट करण्यात आली. तसेच कॉस्ट्युम डिझायनर लक्ष्मी मुकादम यांनी तयार केलेल्या पारंपरिक पोशाखांनाही प्रेक्षकांकडून भरभरून दाद मिळाली.

कार्यक्रमात मनोरंजनाची रंगत वाढवण्यासाठी झी युवा फेम प्रतिम सुतार यांचा लोकप्रिय आणि खेळकर 'होम मिनिस्टर' हा उपक्रमही मोठ्या उत्साहात पार पडला.

स्पर्धेत सहभागी झालेल्या महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाची रंगत वाढवली. स्पर्धेतील तिन्ही विजेत्यांना आकर्षक पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले. हा भव्य महिला दिन महोत्सव पल्लवी म्हात्रे यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे मॅनेजमेंट हेड अमित म्हात्रे होते. महिलांचा सन्मान, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि समाजातील महिलांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित केल्याचे आयोजकांनी सांगितले. चौल-रेवदंडा परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महिला दिनाचा उत्सव आनंदात साजरा केला.

## पीएनपी महाविद्यालयात महिला दिन साजरा

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महिला सक्षमीकरण कक्ष अंतर्गत उत्साहपूर्ण वातावरणात महिला दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नम्रता पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी महिला दिन साजरा करण्यामागील पार्श्वभूमी विद्यार्थ्यांपुढे सादर केली.



या महिला विकास कक्षाचा अभिजात उपक्रम म्हणजे या महिला दिनानिमित्त विवाहनंतर शिक्षणात पंधरा ते वीस वर्षांचा खंड पडलेला असतानाही शिक्षणाप्रती असलेली आवड आणि पाहिलेल्या स्वप्नांची पूर्ती करण्यासाठी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये कला शाखेतून सुवर्णा म्हात्रे, जुईली पाटील, मीनाक्षी म्हात्रे, भक्ती पाटील, प्रणाली माळी, शिवानी घरत, रत्नप्रभा पाटील वाणिज्य विभागातून चित्रा पाटील तसेच विज्ञान विभागातून अक्षता घरत, सानिका वावेकर, प्रतीक्षा थळे, स्नेहा पाटील, प्रियल पाटील या महिला विद्यार्थ्यांनीना सन्मानित करण्यात आले. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी अपर्णा शेळके यांनाही सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी प्रा. कैलास सिंग राजपूत, प्रा. जयश्री ठाकूर यांनी महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना महिलांप्रती भाव व्यक्त करणारी त्यांची झेप ही कविता सादर केली. आज मल्टीटास्किंगच्या जमान्यात चूल आणि मूल ही संकल्पना मागे पडली असली तिची जबाबदारी संपली नाही. उलट घरातील सर्वांचे पथ्यपाणी सांभाळून घर ते ऑफिस आणि पुन्हा घर या रहाटगाड्यात ती यंत्रवत गुंतून पडली आहे. त्यामुळे आरोग्याचे अनेक प्रश्न तिच्यासमोर उभे राहिले आहेत. हा सकळ विचार आपल्या घरापासुन व्हायला व्हावा, असे सांगून विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. पूजा म्हात्रे, सन्मानपत्राचे वाचन डॉ. रसिका म्हात्रे यांनी केले तर आभार डॉ. अमृता शुक्ला यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कांचन म्हात्रे, प्रा. वृषाली घरत, महिला प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## तिघर शाळेत महिलांचा सत्कार

**| कर्जत | प्रतिनिधी |**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कर्जत तालुक्यातील तिघर येथे (दि.८) मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक महिला शिक्षक विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन अतीशय सुंदर केले होते. जनार्धन पजई यांनी प्रास्ताविक केले. तर कांचन देशमुख यांनी महिलांना मार्गदर्शन केले, आशा देशमुख यांनी काव्यात्मक सादरीकरण केले. पूजा सुर्वे यांनी महिला दिनाचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे नियोजन कोमल म्हात्रे, हिरा खुटारे, करिष्मा धामणसे, अश्विनी ढाकोळ, भारती साठे, वेदिका म्हात्रे, स्वरा खुटारे, सदाशिव बांबळे, जनार्धन पजई यांनी केले होते.





## महिलांची रक्त तपासणी

**रसायनी :** लाईफ केअर डायग्नोस्टीक चौक यांच्यावतीने महिला दिनाचे औचित्य साधून महिलांची रक्त तपासणी करण्यात आली. प्रत्येक स्त्री अनेक भूमिका बजावते मुलगी, आई, बहीण, व्यावसायिक, अनेक क्षेत्रांशी निगडीत काम करताना, इतरांची काळजी घेताना, स्वतःची काळजी घ्यायला विसरते, तिला तिची आठवण करून देण्यासाठी निरोगी महिला, निरोगी जग, या संकल्पनेवर आम्ही आमच्या लॅबच्यावतीने रक्त तपासणी केली, असे संचालक सुहास पाटील यांनी सांगितले.

## अॅड. पूजा सुर्वे यांचा सन्मान

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील तिघर येथील जिल्हा परिषद शाळेत महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कायदेशीर सल्लागार म्हणून कार्य करणाऱ्या अॅड. पूजा सुर्वे यांचा यावेळी निपुण सखी म्हणून सन्मान करण्यात आला. यावेळी जनार्दन पजई, कांचन देशमुख, आशा देशमुख, कोमल म्हात्रे, हिरा खुटारे, करिष्मा धामणसे, अश्विनी ढाकोळ, भारती साठे, वेदिका म्हात्रे, स्वरा खुटारे, सदाशिव बांबळे आदी उपस्थित होते.

## लोणेरे विद्यापीठात सांस्कृतिक कार्यक्रम

**| महाड | प्रतिनिधी |**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे पदविका ऑडिटोरियम येथे विद्यापीठाचे माननीय कुलगुरू कर्नल प्राध्यापक डॉ. कारभारी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अमित शेष आणि नरेंद्र बेलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाची सुरुवात झाली.



महिला दिनाचे औचित्य साधून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठांमध्ये दिनांक ७ व ९ मार्च मध्ये विविध स्पर्धा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये कॅरम स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, संगीत खुर्ची, या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.तसेच विद्यापीठात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते. महिला सशक्तीकरण आणि महिलांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमिला पडवळ यांनी केले.

## ज्येष्ठ नागरिक संस्थेतर्फे महिलांचा सन्मान

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबागने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून यावर्षी झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात महिला नगरसेविका व नगराध्यक्षा निवडून आल्यामुळे अशा कर्तृत्ववान महिलांचा सन्मान संस्थेतर्फे करण्यात आला. तसेच, यावेळी अवयवदान मोहिमेत व अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेतर्फे मोलाचे कार्य करणाऱ्या निर्मला फुलगावकर यांचाही सन्मान संस्थेतर्फे करण्यात आला.



ज्येष्ठ नागरिक संस्था अलिबागची त्रैमासिक संपर्क सभा (दि.८) मार्च रोजी क्रीडा भवन अलिबागच्या नाना नानी पार्कमध्ये जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित केली होती. यावेळी उपनगराध्यक्षा अॅड. मानसी म्हात्रे यांचे यांचे सामाजिक सांस्कृतिक व राजकीय जडणघडणीत महिलांचे स्थान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, तसेच अंधश्रद्धा निर्मूलन संघटनेचे कार्यकर्ते नितीन राऊत यांनी मरणोत्तर देहदान व अवयवदान या विषयावर माहिती दिली. कार्यक्रमास प्रणिता वर्तक, मेघना कुलकर्णी, आर. के. घरत, शिल्पा नाईक, दिलीप शिंदे, सुरेखा कोलते, मंगला सावंत, मिलिंद सुळे, मनोहर सुर्वे, सतीश वर्तक, शरद कोरडे व उदय जोशी यांनी विशेष मेहनत घेतली होती. उपाध्यक्षा चारुशीला शरद कोरडे यांनी सर्व उपस्थितांचे, मान्यवरांचे आभार मानून सभेचा समारोप केला.

## महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळात महिला मेळावा

**| वाघ्रण | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील केतकीचा मळा येथे महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळाच्यावतीने रविवारी (दि.८) जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून 'विशेष महिला मेळावा' आयोजित करण्यात आला होता. मैत्रेयी धुंडीराज विनोद यांनी १९२६मध्ये हजारो विद्यार्थ्यांमध्ये मॅट्रीकच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला होता. या घटनेला



शतकपूर्तीचे औचित्य साधून हा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळी माजी परिवहन मंत्री दिवाकर रावते, सुरेंद्र म्हात्रे, लता पडळकर, वरदा पटवर्धन, जिवीता पाटील, अॅड. सई वैद्य यांनी मार्गदर्शन केले.

**पालक-युवकांचा उत्स्फूर्त सहभाग | मार्गदर्शन व समुपदेशन शिबीर संपन्न**

## बालविवाह विरोधात जनजागृतीचा निर्धार

**| कर्जत | प्रतिनिधी |**

समाजामध्ये बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अश्वपरीस फाऊंडेशन, खोपोली यांच्या पुढाकारातून महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, अलिबाग, कर्जत, खालापूर पोलिस स्टेशन व चौक पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सोंडेवाडी, कर्जत खालापूर येथे मार्गदर्शन व समुपदेशन शिबिराचे आयोजन करण्यात आले.



आजही अपुऱ्या शिक्षणामुळे व सामाजिक जागरूकतेच्या अभावामुळे अनेक ठिकाणी बालविवाहाची प्रकरणे घडताना दिसतात. अशा घटनांमुळे कायद्याअंतर्गत गुन्ह्यांची नोंद होऊन संबंधित कुटुंबांना आर्थिक, शारीरिक तसेच मानसिक अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः आदिवासी समाजात अशा घटना टाळण्यासाठी व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे मत अश्वपरीस फाऊंडेशनच्या अध्यक्षा इशिका शेलार यांनी व्यक्त केले. समाजामध्ये बालविवाह रोखण्यासाठी आणि नागरिकांना योग्य माहिती मिळावी, यासाठी अशा प्रकारचे जनजागृती उपक्रम भविष्यातही सातत्याने राबविण्यात येतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या कार्यक्रमादरम्यान बालहक्क आणि त्यासंबंधित कायदे याबाबत उदाहरणांसह सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बालविवाहाचे सामाजिक व आरोग्यविषयक दुष्परिणाम, त्याविरोधातील कायदेशीर तरतुदी तसेच अशा प्रकरणांमध्ये नोंद होणाऱ्या गुन्ह्यांबाबत माहिती देऊन उपस्थितांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. याशिवाय महिलांवर होणारे अत्याचार, न्यायालयीन प्रक्रिया तसेच महिलांना उपलब्ध असलेल्या संरक्षणाच्या कायदेशीर उपाययोजनांबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. आदिवासी बांधवांच्या विविध सामाजिक समस्याही यावेळी ऐकून घेण्यात आल्या. कागदोपत्री प्रक्रियेमध्ये येणारे अडथळे, न्याय मिळण्यात होणारा विलंब तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणी यावरही चर्चा करण्यात आली.

# सिडकोमध्ये महिला दिन

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळामध्ये महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या प्रसंगी मार्च २०२६ अखेरीस निवृत्त होणाऱ्या महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान, बोलताना विशेष अतिथी सुरेश मेंगडे यांनी वेगवेगळ्या काळांतील कर्तृत्वावान स्त्रियांचे दाखले देऊन स्त्रिया सक्षम झाल्याने संपूर्ण समाजाची प्रगती होते, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अखेरीस डॉ. मनिष सोनटक्के आणि डॉ. प्रतिक्षा कदम यांनी उपस्थित महिला कर्मचाऱ्यांस आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. यावेळी विशेष अतिथी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, गणेश देशमुख, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगड, कार्यक्रमाच्या अध्यक्षा अतिरिक्त मुख्य नियोजनकार स्मिता शिरोडकर तसेच सिडको एम्प्लॉईज युनियन अध्यक्ष सुभाष पाटील, सरचिटणीस नितीन कांबळे, डॉ. मनिष सोनटक्के, डॉ. प्रतिक्षा कदम यांसह सिडकोतील महिला अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# माथेरानमध्ये मोफत आभा कार्ड शिबीर

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरान येथे आधार जनसेवा सामाजिक संस्थेतर्फे व चंद्रकांत जाधव व सतिश बर्गे यांच्या पुढाकाराने निराधार महिला व नागरिकांसाठी मोफत आयुष्यमान कार्ड, आभा कार्ड, ई-श्रम कार्ड व एम्प्लॉयमेंट कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात कार्ड काढून शिबिराचा लाभ घेतला. अशा प्रकारचे कार्ड काढण्यासाठी नागरिकांना कर्जतला जावे लागत होते. मात्र, येथे हे शिबीर आयोजित केल्यामुळे महिलांची परवड थांबू शकली, असे सुनीता मोरे यांनी सांगितले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स
मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटिक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय, सा.बां. उपविभाग क्र.१, पनवेल, जि.रायगड | ०१ पिंपळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय सा.बां. उपविभाग क्र.१, पनवेल येथील प्रशासकीय इमारतीच्या उर्वरित भागात नविन इमारतीचे बांधकाम करणेस ०१ पिंपळ झाड बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र.- PMC-PARK/75/2026-PTAD

---

वनभूखंड– पुणे आणि रायगड
महाराष्ट्र राज्यातील पुणे आणि रायगड जिल्ह्यातील २०.१४ हेक्टर वनभूखंडाचे भिवपुरी ऑफ स्ट्रीम ओपन लूप पंप्ड स्टोअरेज प्रकल्पासाठी (१००० मेगावॅट) टाटा पॉवर कंपनी लिमिटेडच्या नावे हस्तांतरण.

### महाराष्ट्र शासन
## महसूल आणि वन विभाग
**शासन आदेश क्र.: एफएलडी –१९२४/सीआर–२१५/एफ–१०**
**मंत्रालय, मुंबई–४०००३२.**
**दिनांक: ०५.०३.२०२६**

**संदर्भ**

१) अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक आणि केंद्रीय अधिकारी, महाराष्ट्र, राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क–१७/नोडल/एस१/पीआयडी–४४७०९४/ठाणे/१३४१/२४–२५, दिनांक ०५.०९.२०२४.
२) महसूल आणि वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासकीय पत्र क्र. एफएलडी–१९२४/सी.आर.२१५/एफ–१०, दिनांक. २५.१०.२०२४.
३) भारत सरकार, पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालय, (वनसंवर्धन विभाग) नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफपी/एमएच/एचवायडी/इरिगे/४४७०९७/२०२३, (FP/MH/HYD/IRRIG/447097/2023) दिनांक १२.०५.२०२५.
४) अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक आणि केंद्रीय अधिकारी, महाराष्ट्र, राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क–१७/एफसीए–एस२/पीआयडी–४४७०९७/पुणे/२०२४–२५/१६२५, दिनांक. १३.१०.२०२५.
५) महसूल आणि वन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासकीय पत्र क्र. एफएलडी–१९२४/सी.आर. २१५/एफ–१०, दिनांक. १७.१०.२०२५.
६) भारत सरकार, पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालय, (वनसंवर्धन विभाग) नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफपी/एमएच/एचवायडी/इरिगे/४४७०९७/२०२३, दिनांक ०४.११.२०२५.
७) अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक आणि केंद्रीय अधिकारी, महाराष्ट्र, राज्य नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क–१७/एफसीए–एस२/पीआयडी–४४७०९७/पुणे/२५–२६/२०२२, दिनांक. २७.११.२०२५.
८) उप वनसंरक्षक (टी.) पुणे पत्र क्र. डेस्क–ए/डेस्क–४.२/ जमीन/१४८८ /२०२५–२६, दिनांक ०९.०१.२०२६.

**आदेशः**

ज्याअर्थी, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी आपल्या संदर्भ क्र. १ मधील पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील पुणे आणि रायगड जिल्ह्यातील २०.१४ हेक्टर वनभूखंडाचे भिवपुरी ऑफ स्ट्रीम ओपन लूप पंप्ड स्टोअरेज प्रकल्पासाठी (१००० मेगावॅट) हस्तांतरण करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. आणि ज्याअर्थी राज्य शासनाने आपल्या संदर्भ क्र. २ मधील पत्रान्वये प्रादेशिक कार्यालय (मध्य), पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांच्याकडे प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवला आहे;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने पूर्ण विचारांती आपल्या संदर्भ क्र. ३ मधील पत्रान्वये उक्तनिर्देशित प्रकल्पासाठी २०.१४ हेक्टर वनभूखंड वन (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम १९८० च्या कलम २ अंतर्गत वळवण्यासाठी 'तत्वतः' मंजुरी दिली आहे. सदर मंजुरी वापरकर्ता आस्थापनेकडून विशिष्ट अटींच्या पूर्ततेच्या सापेक्ष आहे;
आणि ज्याअर्थी, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी आपल्या संदर्भाधीन पत्र क्र. ४ अन्वये महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारला या अटींच्या पूर्ततेचे सादरीकरण सादर केले आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य शासनाने संदर्भाधीन पत्र क्र. ५ अन्वये या अटींच्या पूर्ततेचे सादरीकरण भारत सरकारकडे केले आहे;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वने आणि हवामानबदल मंत्रालय, भारत सरकार (एफसी विभाग), नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र. ६ अंतर्गत महाराष्ट्र राज्यातील पुणे आणि रायगड जिल्ह्यातील २०.१४ हेक्टर वनभूखंडाचे भिवपुरी ऑफ स्ट्रीम ओपन लूप पंप्ड स्टोअरेज प्रकल्पासाठी (१००० मेगावॅट) मे. चीफ हायड्रोज, टाटा पॉवर कंपनी लिमिटेडकडे हस्तांतरण करण्यासाठी 'अंतिम मंजुरी' दिली आहे.

आणि, ज्याअर्थी, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रीय अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्रमांक ७ द्वारे राज्य शासनाला या प्रकरणी वनजमीन हस्तांतरण करण्याचे आदेश जारी करण्याची विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, उपवनसंरक्षक (T.), पुणे यांनी संदर्भ क्र. 8 मधील पत्राद्वारे कळिवले आहे की मौजे खंड सर्व्हे क्र. १०७ मधील एकूण क्षेत्रापैकी ७.६३ हेक्टर क्षेत्र हे दिनांक १६ नोव्हेंबर १९२७ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन अधिसूचना क्र. एस ३६/१३/२०४९१ नुसार वनसंवर्गातून वगळण्यात (Disforestation) आले आहे. या वनसंवर्गातून वगळलेल्या क्षेत्राला नवीन गट क्रमांक ३८० देण्यात आलेला आहे. तसेच मौजे खांड सर्व्हे क्र. १०७, गट क्र. ३८० मधील ०.०१ हेक्टर क्षेत्र हे खाजगी गैर वनक्षेत्र असल्यामुळे ते वळतिकरणासाठी प्रस्तावित क्षेत्रातून वगळणे आवश्यक आहे.

त्यामुळे, आता, महाराष्ट्र शासनाद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की संदर्भ क्र. १ मधील पत्रानुसार सादर केलेल्या प्रस्तावात वर्णन केल्याप्रमाणे आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या तपशीलांनुसार, एकूण २०.१४ हेक्टर क्षेत्र ज्यामध्ये राखीव वनजमीन व खाजगी वनजमीनीचा समावेश आहे यूजर एजन्सी म्हणजेच चीफ हायड्रोस, टाटा पॉवर कंपनी लिमिटेड यांना भिवपुरी ऑफ स्ट्रीम ओपन लूप पम्प्ड स्टोरेज प्रकल्प (१००० मे.वा.) विकासासाठी, पुणे व रायगड जिल्ह्यात, वगळण्यात येत आहे.

पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार (एफसी विभाग), नवी दिल्ली यांच्या दिनांक १२.०५.२०२५ आणि दिनांक ०४.११.२०२५ च्या पत्रात नमूद केलेल्या अटी आणि शर्तीच्या अधीन राहून हे हस्तांतरण केले जाईल. वनजमिनीच्या हस्तांतरणास दिलेली मंजुरी वापरकर्ता एजन्सीकडून खालील अटींच्या पालनाच्या सापेक्ष आहे–

१. वापरकर्ता आस्थापना वर उल्लेख केलेल्या प्रादेशिक कार्यालय, वन आणि वन मंत्रालय, नागपूर यांच्या 'तत्त्वतः' आणि 'अंतिम मंजुरी' पत्रांमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे पालन करेल. मुख्य वनसंरक्षक (टी), पुणे हे वापरकर्ता एजन्सीकडून अटींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची खात्री करतील आणि वेळोवेळी अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि नोडल अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या संदर्भात अहवाल सादर करतील.
२. वन मंत्रालयाच्या प्रादेशिक कार्यालयाकडून आलेल्या १२.०५.२०२५ आणि ४.११.२०२५ रोजीच्या पत्रांमध्ये आणि वन (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत जारी केलेल्या/ लागू केलेल्या नियम आणि मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केलेल्या कोणत्याही अटींचे पालन न करणे हे वन (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम, १९८० चे उल्लंघन असेल आणि त्यानुसार कारवाई केली जाईल.
३. अनुपालनाची खात्री करण्यासाठी आणि सुयोग्यरित्या विहित केलेल्या उपक्रमांचे निरीक्षण करण्यासाठी व इतर वैधानिक कर्तव्ये पार पाडण्यासाठी, वापरकर्ता एजन्सी स्थानिक वन अधिकाऱ्यांना परिसरात विना अडथळा/सुलभ प्रवेश देईल. वापरकर्ता आस्थापनेने मुक्त प्रवेश प्रतिबंधित केला किंवा अडथळे निर्माण केले, तर या आदेशांतर्गत वनक्षेत्र वनेतर वापरासाठी दिलेली परवानगी रद्द केली जाईल.
४. वरीलपैकी कोणत्याही अटींचे पालन न झाल्यास, पुणे येथील मुख्य वनसंरक्षक (टी) हे वन (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार राज्य शासनामार्फत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार (एफसी विभाग), नवी दिल्ली यांना अहवाल सादर करतील.

**सूची**

| अनु क्र. | बाबनिहाय कार्य/ हेतू | जिल्हा | तालुका | गावाचे नाव | भू. क्र. | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ (हेक्टरमध्ये.) | कायदेशीर स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सरफेस पेनस्टॉक | रायगड | कर्जत | भिवपुरी | २०४ (नवीन भू. क्र. २१) | ––– | २६ | ६.२३ | आरक्षित वन |
| २ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.०९ | आरक्षित वन |
| ३ | सरफेस पेनस्टॉक | पुणे | मावळ | सावळे | ७ | १४ पार्ट | १ | ०.४३ | खासगी वन |
| ४ | सरफेस पेनस्टॉक | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | १०.६६ | आरक्षित वन |
| ५ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.१२ | आरक्षित वन |
| ६ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.१८ | आरक्षित वन |
| ७ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | सावळे | ७ | १४ पार्ट | १ | ०.७८ | खासगी वन |
| ८ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | सावळे | ७ | १४ पार्ट | १ | ०.४२ | खासगी वन |
| ९ | एडीट | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.२५ | आरक्षित वन |
| १० | एडीट | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.१२ | आरक्षित वन |
| ११ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.२४ | आरक्षित वन |
| १२ | प्रकल्प घटकाकडे जाणारा प्रवेश मार्ग | पुणे | मावळ | सावळे | ७ | १४ पार्ट | १ | ०.१७ | खासगी वन |
| १३ | भूमिगत एचआरटी | पुणे | मावळ | खांड | १०७ | १५० | ३७अ | ०.४५ | आरक्षित वन |
| | | | | | | | एकूण वनभूखंड क्षेत्रफळ | २०.१४ | |

प्रस्तुत शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाइटवर संदर्भ क्र. २०२६०३०५१७४१३५५११९सह उपलब्ध आहे. सदर आदेशावर डिजिटल स्वाक्षरी करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावे आणि आदेशान्वये
(साहेबराव घिगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. पराग माणिकराव पितळे (वगैरे) रा. मुलुंड मुंबई यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली वरकस मिळकत माझे स्नेही यांनी कायमस्वरूपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| देवघर ता. अलिबाग जि. रायगड | १८५ | ०-३१-१० पो.ख. ०-०५-०० एकुण क्षेत्र ०-३६-१० | ०.६५ |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :-१०/०३/२०२६

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
पत्ता : श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८२२३४८१७३, ८८०५३२८६४६

---

## हरकत नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. सुरेश जगन्नाथ घरत, मु. बामणोली ता. अलिबाग यांच्या ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| बामणोली ता.अलिबाग | १७७ | बिनशेती ५-०६-०० | ५०.६० |

सदर वर वर्णनांकीत मिळकत आमचे अशिल श्री. सुरेश जगन्नाथ घरत यांनी वर नमुद मिळकतीचे पुर्वगामी मालक श्री. अजय बाळकृष्ण सावंत यांचेकडून दि. २५/१०/२००१ रोजीच्या पावती करारान्वये मोबदला रक्कम देऊन खरेदी केलेली आहे. त्यापूर्वी दि. ०६/०२/१९९९ पासून सदर मिळकत आमचे आशिलांचे अखंड ताबे कब्जा वहिवाटीखाली आहे. व सदर मिळकतीचा उपभोग आमचे अशिल घेत आहेत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक आमच्या अशिलांचा वहिवाट हक्क डावलून परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करणार असल्याचे व त्याबाबतचा विक्रीचा करारनामा आमच्या अशिलांनी विश्वासात न घेता करणार असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सदर मिळकतीबाबत आमचे अशिल मा. दिवाणी न्यायालयात दावा दाखल करणार आहेत. सबब सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही कसल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. त्यास आमचे अशिलांची सक्त कायदेशीर हरकत राहील, या उपरही सदर मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे खरेदीखत, बक्षिसपत्र, साठेकरार, वचनचिठ्ठी, सामंजस्य करार केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत असून असा कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक: १०/०३/२०२६

सही /-
**ॲड. विक्रांत वि. पाटील**
म्हात्रोळी, अलिबाग-रायगड
मो.नं. ८३२९४६१५४०/९४०३६५१४३६

---

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्याप्रमाणे आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान मालक श्री. ऋतुराज शिरीष आमले व श्रीमती. शलाका शिरीष आमले यांच्यामध्ये बोलणी करण्यात आलेली आहेत. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| मुशेत ता.अलिबाग, | १९/१ | १-४२-३० | १५.९८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी श्री. ऋतुराज शिरीष आमले व श्रीमती. शलाका शिरीष आमले यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-१५-१० हे.आर. आकार २.३६ रु. पैसे ही मिळकत या नोटीसचा विषय आहे.

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १०/०३/२०२६

**ॲड. अश्विनी अ.म्हात्रे**
बी.ए.एल.एल.एम
००१, वैद्यबाग को.ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) नेहा अशोक दांडेकर आणि २) रजनी अशोक दांडेकर यांचेकडून कायम मालकी हकाने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहकाची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - पेझारी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५१/४, एकूण क्षेत्र ००-४०-६० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ६.२५/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक १०/०३/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
विक्रांत झुंजारराव

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) छाया हरिश्चंद्र थळे, २) निर्मलाबाई वसंत पाटील, ३) प्रफुल्ल वसंत पाटील, ४) मोहन वसंत पाटील, ५) विकास वसंत पाटील, ६) सुधीर वसंत पाटील, ७) वर्षा महेश गौंडर, ८) जयवंती शरद पाटील आणि ९) सचिन शरद पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - पेझारी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५५/२, एकूण क्षेत्र ००-७६-८० (हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. १२.०६/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १०/०३/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
विक्रांत झुंजारराव

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गारपोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या क्षेत्राची मिळकत, त्या मिळकतीचे मालक महेंद्र धोंडु म्हसे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ९७ | एकुण क्षेत्र ०-६१-२० पैकी महेंद्र धोंडु म्हसे यांच्या मालकीचे क्षेत्र ०-३९-५० हे. आर. | ०-६८ |

सबब सदर वर नमुद केलेल्या क्षेत्राच्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील वर्णनाच्या क्षेत्राच्या मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : -१०/०३/२०२६

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि.रायगड -४१०२०१.

---

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सदानंद दामोदर पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहकाची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-पेझारी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ५६/२/अ, एकूण क्षेत्र ०० -५०-७० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. ७.९४/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १०/०३/२०२६
**झुंजारराव आणि कं. करीता**
सही/-
विक्रांत झुंजारराव

---

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे विहुर, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली जमिन मिळकत श्री. योगेश ललितकुमार जैन, राहणार नांदगाव, ता. मुरूड, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. योगेश ललितकुमार जैन, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| विहुर, ता.मुरुड. | २११ | ०-१५-२० एकूण | ०३-१४ |

अलिबाग,
दिनांक ०९/०३/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागाव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) विजयकुमार रामचंद्र क्षिरसागर २) सुनंदा नंदकुमार क्षिरसागर ३) मयुर नंदकुमार क्षिरसागर ४) मनिषा कैलास सावंत ५) दर्शना मिलिंद गोसावी यांचे कडुन कायम मालकी हक्ने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग | ६९३ | ०-००-७० बागायत ०-००-८० पो.ख. ०-०१-५० एकुण | ०.१२ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - ०९/०३/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.क्र.९९२२७९८५२८

विनायक दळवी

## हा संजू सॅमसनचा विश्वचषक !

भारताने टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत नवा इतिहास घडविला. या स्पर्धेत गत विजेत्याने पुन्हा सलग लागोपाठ विजेतेपद कधीच पटकावलं नव्हतं. भारताने यंदा ती किमया करून दाखवली. भारताने याआधी २००७ व २०२४ आणि यंदा म्हणजे २०२६ ची ट्वेंटी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धा जिंकली आहे.

भारताला, गतविजेता पुन्हा विजेता न होण्याचा विक्रम मोडायचा होताच. पण त्यापेक्षा भारताला अहमदाबादच्या या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम वरील गत पराभवाचे मानगुटी वर बसलेले भूत उतरवायचे होते. २०२३ ला ऑस्ट्रेलिया विरुद्ध पन्नास षटकांच्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताला अपेक्षा नसताना पराभवाला सामोरे जावं लागलं होतं. फक्त भारतीय खेळाडूंनाच नव्हे तर तमाम भारतीय क्रिकेट रसिकांना आणि स्थानिक क्रिकेट प्रेमींना देखील असंच वाटत होतं की, हे स्टेडियम भारतासाठी अनलकी आहे.

त्या साऱ्या शंका-कुशंका आणि मागील इतिहासाला रविवारी भारतीय क्रिकेट संघाने तिलांजली दिली. भारताने हा सामना सहज जिंकला. जो न्यूझीलंड संघ उपांत्य फेरीत, भारताला हरविणाऱ्या दक्षिण आफ्रिका संघाविरुद्ध ज्या तडफेने खेळला. त्याची झलक देखील रविवारी अंतिम सामन्यात दिसली नाही.

भारताने अंतिम सामना एकतर्फी जिंकला, त्याचं श्रेय प्रामुख्याने संजू सॅमसन या भारताच्या तडाखेबाज फलंदाजाला जाते. भारतीय संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सामन्यात पराभूत झाला. संजू सॅमसनसाठी भारतीय संघाचे द्वार अनपेक्षित पणे उघडलं. खरंतर संजू सॅमसन हा, एखाद्या लहरी हवामानासारखा खेळत असतो. कधी तो फॉर्मात असतो. कधी त्याचा फॉर्म अचानक जातो. यावेळी मात्र भारतीय संघाला त्याच्या फलंदाजीनेच हात दिला.

म्हणजे बघा, आपण वेस्ट इंडिज विरुद्ध सामना आपल्यासाठी निर्णायक सामना होता. त्या सामन्यातील पराभव आपल्याला या स्पर्धेतून बाद करणार होता. त्यानंतर मुंबईतला सामना. मुंबईतला सामना तर उपांत्य फेरीचा सामना होता. या सामन्यात इंग्लंडच्या फलंदाजांनी ज्या पद्धतीने फलंदाजी केली, ती पाहता संजू सॅमसनच्या ८५ धावा किती निर्णायक ठरल्या ते आपल्या लक्षात येईल. अंतिम सामन्यात देखील पहा. संजीव सॅमसनच्या तडाखेबाज डावावरच भारताचा २५५ धावांचा डोलारा उभा राहिला होता. हा सॅमसन आयपीएल स्पर्धेत देखील असाच ऑन ऑफ हिरो ठरत असतो. कधी अप्रतिम खेळतो कधी निराशाजनक खेळ करत असतो. यावेळी मात्र त्याला दोन परिसांचा स्पर्श झाला आहे.

म्हणजे सचिन तेंडुलकर यांच्याकडून मार्गदर्शन घेतल्यानंतर सॅम सनच्या फलंदाजीत खूपच बदल झालेले पाहायला मिळतात. त्यानंतर त्यापेक्षाही महत्त्वाचे मार्गदर्शन त्याला महेंद्रसिंग धोनीकडून लाभले आहे. महेंद्रसिंग धोनी स्वतः शांत आणि कोणत्याही परिस्थितीत न डगमगणारा धीर गंभीर खेळाडू आहे. याच धोनीने संजू सॅमसनला आता चेन्नई सुपर किंग्सकडून खेळताना, अनेक कानमंत्र दिले आहेत. ज्याचा संजू सॅमसन ला फायदा झाल्याचे विश्वचषक स्पर्धेत आपण पाहतोय. संजू सॅमसन किती कठीण परिस्थिती असली तरी शांतपणे, धीरोदात्तपणे मैदानावर उभा राहतो. संजू सॅमसनचा फटकांचा भाता खचाखच भरलेला आहे. त्याच्याकडे सर्व तऱ्हेचे फटके आहेत. ऑफकट तसेच ऑनकट देखील त्याचे ड्रायव्हिंग आणि पूलचे खणखणीत फटके पाहायलादेखील बरे वाटतात. या फटक्यांचा तो बिंदिकतपणे वापर करतो. परिस्थिती कोणतीही असू दे, तो खराब चेंडू मिळाला तर हे फटके खेळण्यास जराही कचरत नाही. त्यामुळे प्रतिस्पर्धी संघावर, विशेषतः त्यांच्या प्रमुख गोलंदाजांवर प्रचंड दडपण येते. हे आपण यंदाच्या विश्वचषकातच पाहिले. संजू सॅमसनच्या समावेशानंतरच भारतीय संघाचा फलंदाजीतला हा नवा अवतार किंवा आवेश आपण पाहतोय. कारण या आधी भारतीय संघ अडखळत फलंदाजी करताना दिसायचा. सॅमसन आल्यानंतर भारतीय फलंदाजी मध्ये किंवा अन्य फलंदाजांमध्ये जो जोर आलाय, आत्मविश्वास आलाय, त्याचे श्रेय सॅमसन याच्या फलंदाजीलाच द्याव लागेल. कारण त्याच्याकडे पाहून अन्य फलंदाज देखील मुक्तपणे फटकेबाजी करायला लागले. जी गोष्ट या स्पर्धेच्या सुरुवातीला आपल्याला अभावानेच पाहायला मिळाली होती. सॅमसन यष्टिरक्षण ही देखील जमेची बाजू आहे. त्यामुळे एक जागा किंवा एक खेळाडू, आपल्याला अधिक खेळवता येतो.

भारतीय संघाने विश्वचषक तर जिंकला आहे. मात्र संघातील खेळाडूंची निवड योग्य रीतीने व्हावी हेच संजु सॅमसन याच्या कामगिरीमुळे अधोरेखित झाले आहे. किमान यापुढे सॅमसनसारखा अन्याय, अन्य खेळाडूंवर होऊ नये, हीच अपेक्षा.

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धा

# भारत तिसऱ्यांदा विश्वविजेता





| अहमदाबाद | वृत्तसंस्था |

टी-२० वर्ल्ड कप सुरू होण्यापूर्वी, भारताचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांची एक जाहिरात आली. यात रोहित असे म्हणताना दिसला की, टीम इंडिया हिस्ट्री रिपीट भी करेगी और टीम इंडिया हिस्ट्री डिफीट भी करेगी। सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने ८ मार्च रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये न्यूझीलंडला ९६ धावांनी हरवून इतिहास पुन्हा घडवला आणि इतिहासाला हरवलेही.

या ऐतिहासिक अंतिम सामन्याची सुरुवात भारताला विश्वविजेता बनवणाऱ्या कर्णधारांनी केली. जेव्हा २००७ चे विश्वविजेते कर्णधार धोनी आणि २०२४ चे विश्वविजेते कर्णधार रोहित ट्रॉफी घेऊन आले. सामन्याचा टॉस न्यूझीलंडने जिंकला आणि कर्णधार सँटनरने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण, भारतीय ओपनर्सनी पॉवरप्लेमध्ये सँटनरचा निर्णय चुकीचा ठरवला. सॅमसन आणि अभिषेकच्या जोडीने पॉवरप्लेच्या ६ षटकांत एकही विकेट न गमावता ९२ धावा केल्या. जो टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात मोठा पॉवरप्ले स्कोर आहे.

सलामीवीरांनी ९८ धावांची सलामीची भागीदारी केली. ही भागीदारी रचिन रवींद्रने अभिषेकला झेलबाद करून मोडली. अभिषेक २१ चेंडूंमध्ये ५२ धावा करून बाद झाला. ही टी-२० विश्वचषक फायनलच्या इतिहासातील सर्वात मोठी सलामीची भागीदारी आहे.अभिषेक बाद झाल्यानंतर ईशान किशन क्रीझवर आला. सॅमसनने किशनसोबत दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. या जोडीने ४८ चेंडूंमध्ये १०५ धावा जोडल्या. याच्या मदतीने इंडियाची धावसंख्या १५ षटकांत २०० च्या पुढे गेली.



एकेकाळी असे वाटत होते की भारतीय संघ २० षटकांत ३०० धावांचा टप्पा पार करेल. मात्र, १६वे षटक घेऊन आलेल्या जिमी नीशमने एका षटकात ३ बळी घेऊन रन रेटला ब्रेक लावला. त्याने पहिल्या चेंडूवर सॅमसनला (८९ धावा), पाचव्या चेंडूवर ईशान किशनला (५४ धावा) आणि शेवटच्या चेंडूवर सूर्यकुमारला (शून्य) पॅव्हेलियनमध्ये पाठवले. पुढील २४ चेंडूंमध्ये फक्त २८ धावाच झाल्या. त्यानंतर शिवम दुबेने २०व्या षटकात ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २४ धावा केल्या आणि टीम इंडियाचा स्कोर २५५ धावांपर्यंत पोहोचवला. टी-२० विश्वचषक अंतिम सामन्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठी धावसंख्या आहे.२५६ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. संघाने पॉवरप्लेमध्ये ५२ धावा करताना ३ विकेट गमावल्या. फिन ॲलन (९ धावा), रचिन रवींद्र (एक धाव) आणि ग्लेन फिलिप्स (५ धावा) लवकर बाद झाले.

### बुमराह सामनावीर, सॅमसन मालिकावीर

अंतिम सामन्यात १५ धावा देऊन ४ बळी घेणारे जसप्रीत बुमराह सामनावीर ठरले. तर, ५ सामन्यांमध्ये ३ अर्धशतकांच्या मदतीने ३२१ धावा करणाऱ्या संजू सॅमसनला मालिकावीर म्हणून निवडण्यात आले.

### टिम सायफर्टची अर्धशतक



सुरुवातीचे विकेट्स लवकर गमावल्यानंतरही सलामीवीर टिम सायफर्टने एक बाजू सांभाळून ठेवली. त्याने २६ चेंडूंमध्ये ५२ धावांची खेळीही केली. त्याच्याशिवाय कर्णधार मिचेल सँटनरने ४३ धावा केल्या. पण, संघाचा पराभव टाळू शकले नाहीत. त्यांचा संघ १९ षटकांत १५९ धावांवर सर्वबाद झाला.



● भारतीय क्रिकेट संघाने टी २० विश्वचषक जिंकल्याने अलिबागमध्ये स्थानिक तरुणांनी तिरंगा झेंडा फडकवत जल्लोष केला (छाया : समीर मालोदे )

## भारताच्या लक्ष्य सेनला उपविजेतेपद

| बर्मिंगहॅम | वृत्तसंस्था |

भारताचा अनुभवी खेळाडू लक्ष्य सेन याचे ऑल इंग्लंड अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत जेतेपद पटकावण्याच्या आशांना रविवारी पुन्हा एकदा सुरुंग लागला. चीन तैपईच्या लीन चून यी याने लक्ष्य सेनवर दोन गेममध्ये मात केली आणि अजिंक्यपदावर नाव कोरले. लक्ष्य सेन याला २०२२नंतर पुन्हा एकदा या स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.लक्ष्य सेन याने या स्पर्धेमध्ये जगातील सर्वोत्तम खेळाडूंना पराभूत करण्याची करामत करून दाखवली होती. त्याने शी यू की आणि ली शी फेंग यांना नमवले. लक्ष्य सेन याने उपांत्य फेरीच्या लढतीत व्हिक्टर लाई याच्यावर विजय मिळवताना देदीप्यमान खेळ करून दाखवला होता. ९७ मिनिटे ही लढत रंगली. लक्ष्य सेन-लीन चून यी यांच्यामधील अंतिम फेरीची लढत ५७ मिनिटे रंगली. लीन चून यी याने पहिला गेम २१-१५ असा आपल्या नावावर केला. पुढील गेममध्ये लक्ष्य सेनकडून झुंज देण्यात आली; मात्र दबावाखाली लक्ष्य सेनकडून सुमार खेळ करण्यात आला. अखेर लीन चून यी याने हा गेम २२-२० असा आपल्या नावावर केला व जेतेपद पटकावले.

## आरडीसीए तर्फे महिला रायगड प्रीमियर क्रिकेट लीगचे आयोजन

■ जिल्ह्यातील विविध मैदानांवर होणार सामने

■ नोंदणीकृत खेळाडूंनाच स्पर्धेत सहभाग

| रायगड | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने महिला रायगड प्रीमियर लीग २०२६ चे आयोजन येत्या मार्च व एप्रिल महिन्यात जिल्ह्यातील विविध क्रिकेट मैदानांवर करण्यात येणार असल्याची घोषणा आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांच्या वतीने काल महिला दिनाच्या निमित्ताने करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील महिला क्रिकेटचा दर्जा उंचावणे तसेच जिल्ह्यातील शहरी भागासह जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांना क्रिकेट खेळासाठी प्रोत्साहन देणे व त्यांच्या खेळाला चांगल्या दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असणार आहे.महिला क्रिकेटपटूंना अधिक खेळाची संधी उपलब्ध व्हाव्यात आणि जिल्ह्यातील प्रतिभावान महिला खेळाडू पुढे याव्यात यासाठी या स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या महिला खेळाडूंनी रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनकडे अधिकृत नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत खेळाडूंनाच स्पर्धेत सहभागी होता येणार आहे.

महिला रायगड प्रीमियर लीग २०२६ साठी नाव नोंदणीची अंतिम तारीख १५ मार्च २०२६ अशी निश्चित करण्यात आली असून रायगड जिल्ह्यातील सर्व महिला क्रिकेटपटूंनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.स्पर्धेच्या नोंदणी विषयी अधिक माहितीसाठी खालील प्रतिनिधींशी संपर्क साधावा,जयंत नाईक (अलिबाग), देवा पाटील (पेण), योगेश पवार (पेण), नाना मयेकर (उरण), महेंद्र भातिकरे (रोहा), आवेश चीचकर (महाड), रोहित कार्ले (खोपोली), संदीप जोशी (अलिबाग), रोहित काळे (माणगांव) आणि विनय पाटील (पनवेल खारघर) तसेच स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## विजय गिरी, भावेश नावलू जोडीची हॅट्ट्रिक

| मुंबई | क्रीडा प्रतिनिधी |

दादर शिवाजी पार्क जिमखानातर्फे १० व्या प्रभाकर खानोलकर स्मृती सहाय्यक प्रशिक्षक आणि मार्करसाठींच्या दुहेरीच्या टेनिस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत विजय गिरी आणि भावेश नवलू जोडीने विजेतेपद पटकावले. या जोडीचे हे सलग तिसरे विजेतेपद आहे. तर, विक्रम कोरगांवकर आणि आकाश कोरगांवकर जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत देशभरातून सहाय्यक प्रशिक्षक आणि मार्कर्स सहभागी झाले होते. अंतिम सामना विजय गिरी-भावेश नावलू जोडीने ६-१ असा जिंकला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा शिवाजी पार्क जिमखान्याचे सरचिटणीस संजीव खानोलकर आणि सहाय्यक चिटणीस सुनील रामचंद्रन यांचे हस्ते झाला. विजेत्या विजय गिरी आणि भावेश नावलू जोडीला ३० हजार रूपयांचे पारितोषिक मिळाले. यावेळी जिमखान्याचे विश्वस्त प्रकाश नायक, टेनिस विभागाचे चिटणीस योगेश परूळेकर, इनडोअर विभागाचे चिटणीस सनील समेळ तसेच चंद्रकांत राऊत आणि जितू केवलानी आदी उपस्थित होते. तसेच, या स्पर्धेचे आयोजन टेनिस खेळाचे प्रशिक्षक संजीय पटेल यांनी केले. प्रभाकर खानोलकर यांचे नातू आणि उद्योजक संकेत खानोलकर हे या स्पर्धेचे प्रायोजक होते. या स्पर्धेला मनसेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी स्पर्धेला भेट दिली.

## कृष्णाई वाडकर यांचा सत्कार

| पनवेल | प्रतिनिधी |



कोकणस्थ परिवार, पुणेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय पदक विजेती कुस्तीपटू कृष्णाई वाडकर हिच खास सत्कार मुग्धा साने यांच्या हस्ते पंडित नेहरू स्टेडियम, पुणे करण्यात आला. अध्यक्षस्थानी सोनिया नेवरेकर होत्या.

प्रिया पेडणेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. असफिया सय्यद यांनी प्रास्ताविक केले तर अनुराधा मांजरेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. दीपिका वाडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. समारंभास कृष्णाईच्या आई प्रियांका, वडील प्रशांत, तसेच वैशाली टेंबवलकर, बाळासाहेब साने, डॉ. अमोल सप्तर्षी, ॲड. सागर कुलकर्णी, प्रा. अजित नगरकर, आनंद पवार, ॲड. दिनकरराव शिंदे, क्रीडा संघटक सुनील नेवरेकर आदी क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

## थेरोंडा पानसेवाडीत क्रीडा महोत्सव साजरा

| रेवदंडा | प्रतिनिधी |



थेरोंडा पानसेवाडी येथे होळीच्या आदल्या दिवशी क्रीडा महोत्सव साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमाची सुरुवात रेवदंडा ग्रामपंचायत सरपंच व पाचकळशी माळी समाज मा अध्यक्ष यांच्या हस्ते जोगेश्वरी मंदिर सप्तआसरा देवी मंदिर व क्रीडांगण येथे नारळ फोडून झाली.

संगीत खुर्ची, चमचा गोटी, क्रिकेट ह्या कार्यक्रमात लहान मुलांपासून जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्व सहभाग घेतात. या कार्यक्रमास सुरेश घरत, विनोद घरत, मनोज घरत, भास्कर घरत, अनिल घरत, रामचंद्र पाटील, मधुकर नाईक, संतोष घरत, प्रभाकर घरत, विलास घरत, सुभाष घरत, अशोक पाटील, राकेश परकर, रवींद्र परकर, सुजित घरत, विराज घरत, साहिल घरत, संतोष म्हात्रे, सौरव घरत, यश म्हात्रे असे अनेक मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. २०० ग्रामस्थानी या कार्यक्रमात भाग घेतला.

## माइंडस्पेस इकोरन मॅरेथॉनचे आयोजन

| नवी मुंबई | प्रतिनिधी

माइंडस्पेस ऐरोली ईस्ट, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या माइंडस्पेस इकोरन २.० मध्ये ४००० हून अधिक महिला-पुरुष धावपटूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेत विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली होती. २१ किमी हाफ मॅरेथॉनसाठी २० हजार, १४ हजार आणि १० हजार अशी पारितोषिके देण्यात आली. १० किमी श्रेणीसाठी १४,०००, १२,००० आणि ८,००० अशी पारितोषिके देण्यात आली.

महाजने बौध्दवाडी प्रिमिअर लिग स्पर्धेचे तिसरे पर्व | एक दिवस गावासाठी आणि एकजूटीसाठी संकल्पना

## प्रशांत दादा वॉरिअर्स अंतिम विजेता

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

महाजने बौध्दवाडी प्रिमिअर लिग क्रिकेट स्पर्धेचे तिसरे पर्व रविवारी (दि.८) महाजने येथे झाले. या स्पर्धेतील अंतिम विजेता प्रशांत दादा वॉरिअर्स संघ ठरला.या संघाला प्रथम क्रमांकाचे चषक देऊन सन्मानित करण्यात आले. चित्तथरारक असा हा सामना झाला. या सामन्यात प्रशांत दादा वॉरिअर्स संघाने दमदार कामगिरी करीत विजय मिळविला. एक दिवस गावासाठी आणि एकजुटीसाठी या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु करण्यात आला.

स्पर्धेचे उद्घाटन गावांतील सल्लागार राम जाधव, संतोष जाधव व महिलांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी संघ मालक प्रकाश जाधव, अमर जाधव, महेश जाधव, सदानंद दुधाळे, कप्तान, खेळाडू आणि क्रीडा प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संघर्ष योध्दाच्या नावाने प्रशांत दादा वॉरिअर्स संघ

महाजने गावातील प्रशांत जाधव हे एक नावाजलेले व्यक्तीमत्व होते. एक संघर्ष योध्दा होते. मेहनती, कष्टाळू अशी त्यांची ख्याती होती. सामाजिक कार्यातदेखील ते सक्रिय होते. परंतु अल्पशा आजारामुळे वयाच्या ३२व्या वर्षी त्यांचे १२ ऑगस्ट २०१२ मध्ये निधन झाले. त्यांची आठवण म्हणून त्यांचे बंधू प्रकाश जाधव यांनी प्रशांत दादा वॉरिअर्स नावाने संघ तयार केला.

अंतिम सामना प्रशांत दादा वॉरिअर्स आणि प्रशिक इलेव्हन या संघात झाला. प्रशांत दादा वॉरिअर्स संघाने तीन षटकांमध्ये ४० धावा केल्या. प्रशिक इलेव्हन संघासमोर ४१ धावांचे आव्हान होते. मात्र प्रशांत दादा वॉरिअर्स संघाने तीन षटकांत ३३ धावांमध्ये खेळ आटोपून विजय आपल्याकडे खेचून घेतला. चित्तथरारक असा हा अंतिम सामना झाला. प्रशिक इलेव्हन संघाला शेवटच्या दोन चेंडूत सात धावांची गरज होती. गोलंदाजाने कौशल्य दाखवत प्रशांत दादा वॉरिअर्स संघाला सात धावांनी विजय मिळवून दिला. या स्पर्धेत शुभम जाधव, प्रशिक जाधव, सुयश पाटील, पारस मोहिते, संघर्ष जाधव, पार्थ जाधव, बाळाराम जाधव, प्रकाश जाधव यांची महत्वपूर्ण भूमिका ठरली. त्यामुळे प्रशांत दादा वॉरिअर्स संघ अंतिम विजेता ठरला. प्रशिक इलेव्हन संघाने द्वितीय, अंबराई संघाने तृतीय क्रमांक मिळविला. तसेच शुभम जाधव या खेळाडूला सामनावीर, प्रशिक जाधव या खेळाडूला उत्कृष्ट गोलंदाज, सुयश पाटील या खेळाडूला स्पर्धेचा मालिकावीर आणि उत्कृष्ट फलंदाज म्हणून सुशांत जाधव या खेळाडूला गौरविण्यात आले. बक्षीस वितरण गावातील महिलांच्या हस्ते केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)